४

# नचिकेता

'कैपु' लक्ष्मीनरसिंह शास्त्री



9391
9399
BVBK-0401311
BVBK-0401311

वाच. बा. वा.
९३९९
६।१।८२

पुष्प ४

# नचिकेता

लेखक
'कैपु' लक्ष्मीनरसिंह शास्त्री

अनुवादक
प्रभाकर पुराणिक

मुख्य संपादक

BVBK-0401311
BVBK-0401311

भारत-भारती (मराठी संस्करण)
रुईकर पथ, नागपूर–२

प्रकाशक

भारत-भारती (मराठी संस्करण) बाल पुस्तकमाला

प्रभाकर फैजपूरकर
मंत्री
श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती
रुईकर पथ, नागपूर, महाराष्ट्र

संपादक–मराठी संस्करण
सुरेश दत्तात्रेय देशपांडे

पहिली आवृत्ती–जुलै १९८०
दुसरी आवृत्ती–एप्रिल १९८१

मूल्य रु. २–००

मुद्रक
चंद्रकांत तापस
श्री प्रसाद मुद्रण, ८ वर्धा मार्ग, नागपूर–१२

९३९९ दि. ६/१/८२

## थोडे उपक्रमाविषयी

आपल्या पूर्वजांचे स्मरण म्हणजे कर्तृत्वाच्या प्रेरणेचा अखंड स्रोत. त्यांच्या जीवनातून आपल्याला नेहमीच बोध आणि मार्गदर्शन मिळत आलेले आहे. केवळ भारतीयांनाच नव्हे, तर जगातील साऱ्या मानवांना, आपले हे सांस्कृतिक धन म्हणजे एक कुतूहलाचा विषय आहे.

आपला गौरवशाली इतिहास ज्यांनी निर्माण केला, त्या महान व्यक्तींची जीवनचरित्रे सरळ, सोप्या आणि सहज पद्धतीने सादर करण्याचे कार्य बंगलोरच्या 'राष्ट्रोत्थान परिषदे'ने सुरू केले. कन्नड आणि इंग्रजी भाषांमधून लिहिलेल्या छोटचा–छोटचा पुस्तकांच्या रूपाने हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोचविण्याचे हे कार्य आहे. मुळात ही चरित्रे कन्नड भाषेमध्ये लिहिलेली आहेत.

नागपूरच्या 'श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती'ने या चरित्रांचे मराठी अनुवाद प्रकाशित

करण्याची जबाबदारी स्वीकारलेली असून 'भारत-भारती' (मराठी संस्करण) या उपक्रमाच्या अंतर्गत हे प्रकाशनकार्य चालू आहे.

आपले ऐतिहासिक महापुरुष, ऋषी-मुनी, सम्राट, वीर, योद्धे, साधुसंत, राजनीतिज्ञ, कलावंत इत्यादी साऱ्यांचा समावेश या पुस्तकमालेत आहे.

हा अक्षय ठेवा उमलत्या पिढीच्या स्वाधीन करीत असता त्या कार्यात आपल्यालाही काही वाटा उचलता आला, याबद्दल आम्हाला आनंद वाटतो. आपणासही हा उपक्रम आवडेल आणि आपले सहकार्य या उपक्रमास लाभेल, असा विश्वास आहे.

विनीत
**सुरेश दत्तात्रेय देशपांडे**
संपादक

## नचिकेता

प्रत्यक्ष यमराजाकडून ज्याने उपदेश आणि ज्ञान मिळविले तो हा धैर्यशाली बालक. लहानपणापासूनच अतिशय जिज्ञासू. " मी तुला, मृत्यूला दान दिलं आहे," असे त्याचे वडील रागाच्या भरात उद्गारले आणि नचिकेत्याने त्याचा वरदान म्हणून आनंदाने स्वीकार केला. आपल्या विनयाने आणि नम्रतेने यमराजाला संतुष्ट करून यमदेवाकडून त्याने अग्निविद्या व आत्मज्ञान प्राप्त केले; इतरांनाही आत्मोद्धाराचा मार्ग दाखविला. असा हा महान बाल ऋषी नचिकेता.

• • •

म. ग्रं. सं. ... ग्रंथालय शाखा
१३११ दि. ६।१।८२
विषय ........

# नचिकेता

लहानसा मुलगा ! मोठ्यांपासून पुष्कळ काही शिकावे इतक्या लहान वयाचा.

परंतु थोरामोठ्या महर्षींनी त्याची प्रशंसा केली. त्याच्या वडिलांना ते म्हणाले, "असा गुणवान पुत्र आपणास लाभला. धन्य झालात तुम्ही !"

त्या मुलाने प्रत्यक्ष यमराजाकडून विद्या शिकून घेतली, वर मिळवला. यमराजाने त्याची पाठ थोपटली. असा हा पुण्यपुरुष म्हणजेच नचिकेता.

जगात ज्ञानापेक्षा मोठे दुसरे कोणतेच धन नाही. जगातले अमूल्य ज्ञान मिळवून ते दुसऱ्याला देणारे ज्ञानदाते पुण्यपुरुषच असतात.

नचिकेत्याने लहानपणीच अपार ज्ञान मिळवले. तें जगाला दिले. नचिकेता बाल-ऋषी झाला.

१३११ दि. ३।१९।

## उद्दालक-विश्ववरा

ऋषींचे जीवन अत्यंत पवित्र असते, "सर्वेजना: सुखिनो भवंतु ।"-- सगळ्यांचे कल्याण व्हावे. सगळे सुखी होवोत; हेच त्यांच्या जीवनाचे लक्ष्य. स्वत: वेदांचा अभ्यास करावा, तो योग्य व्यक्तींना शिकवावा, दान करावे, दान घ्यावे, यज्ञ करावा, तपश्चर्या करावी हेच त्यांचे रोजचे कार्य.

असे लोक जेथे राहतात त्याला तपोवन म्हणतात. एका तपोवनात अनेक ऋषी राहतात. त्यांच्या घरांना आश्रम म्हणतात. त्याचे छप्पर झाडपाल्याने, गवताने शाकारलेले असते.

अशाच एका तपोवनात उद्दालक नावाचे ऋषी, त्यांची पत्नी विश्ववरा हिच्यासह राहात होते.

उद्दालक विद्वान होते. त्यांनी कित्येक यज्ञ केले होते. अन्नदान करणाऱ्यांमध्ये त्याचे नाव सर्वप्रथम असायचे. उद्दालक ऋषींचे घराणें त्यांच्या पूर्वजांपासून अन्नदानासाठी प्रसिद्ध होते. म्हणून

लोक त्यांना वाजश्रवस या नावाने हाक मारीत असत. वाजश्रवस याचा अर्थ आहे विशेष अन्नदान करणारा.

वाजश्रवस ऋषींमध्ये गुणांबरोबर एक दोष होता. तो म्हणजे त्यांचा धगधगत्या आगीसारखा राग. ते क्षणात भडकायचे. जर का ते रागावले, तर त्यांच्या समोरचे सगळे भस्म व्हायचे. इतका प्रचंड राग.

परंतु मनाने ते अतिशय भोळे होते. त्यांचा राग एकदा शान्त झाला, की मग त्यांच्यासारखा माणूस दुसरा नाही.

त्या उलट, विश्ववरा ही शांत स्वभावाची साध्वी होती. घरकाम अगदी व्यवस्थित सांभाळायची आणि आपल्या पतीला त्याच्या यज्ञयागात मदत करायची. पती हाच आपला परमेश्वर आहे, असे समजणारी ती एक पतिव्रता होती.

पण त्यांना पुत्र नव्हता. म्हणून ती दुःखी होती. ती रोज देवाला प्रार्थना करायची– " देवा,

आमच्या वंशाचा दिवा पुढे तेवत ठेवणारा एखादा पुत्र आम्हाला दे." पत्नीचे हे दुःख बघून वाजश्रवस तिचे सान्त्वन करायचे. म्हणायचे, " विश्ववरे, रडू नकोस. पुत्र व्हावा म्हणून मी यज्ञ करीन. देव-देवतांना प्रसन्न करून घेईन."

आणि वाजश्रवसांनी यज्ञ केला. देवता संतुष्ट झाल्या. विश्ववरा गर्भवती झाली. एका शुभ मुहूर्तावर तिने एका पुत्राला जन्म दिला. दोघांनाही खूप आनंद झाला. बाराव्या दिवशी बारसे केले आणि नाव ठेवले– नचिकेता.

सोन्यासारखा धमक रंग, चमकणारे सुंदर डोळे, चाफेकळीसारखे नाक, दुधाच्या सायीसारखे मऊ-मऊ गाल, ओठावर मधुर हास्य, असा तो देखणा मुलगा. बघणारा त्याला लाडाने जवळ घेई. त्याचा मुका घेई आणि म्हणे, किती सुंदर !

## बाल नचिकेता

लहानगा नचिकेता हळूहळू पावले टाकू लागला. दुडूदुडू धावू लागला. तोतडे बोबडे बोलू लागला. तो लुटुलुटू चालत आपल्या वडिलांच्या यज्ञमंडपा-

पर्यंत जायचा. दूर उभा राहायचा आणि मंत्र ऐकत बसायचा.

आई स्तोत्र म्हणे, ते ध्यान देऊन ऐकायचा, म्हणायचा, "आई, मला शिकव न गं." आईकडून त्याने अनेक स्तोत्रे शिकून घेतली. तो एकपाठी होता. एकदा सांगितले की त्याला दुसऱ्यांदा सांगायची गरज नसे. तो स्वतःच म्हणून दाखवायचा, त्याची स्मरणशक्ती फार तीव्र होती.

इतर मुलांप्रमाणे नचिकेता खेळत-हुंदडत नसे, खोड्या करीत नसे.

सूर्योदय व्हायच्या आधी तो उठायचा. स्नान करून स्तोत्र, पाठ वगैरे म्हणायचा आणि देवपूजेसाठी बगिच्यातून फुले तोडून आणायचा. आई गायीची पूजा करायची. तिच्याबरोबर हाही पूजा करायचा. नंतरच दूध प्यायचा.

वाजश्रवस यांच्या गोशाळेत शेकडो गायी होत्या. राजे-महाराजे, सावकार-श्रीमंत यांच्याकडे वाजश्रवस यज्ञ करायला जात. तेथे त्यांना दक्षिणा

म्हणून गायी मिळायच्या. त्या काळात गोधन श्रेष्ठ मानले जात होते. ज्याच्याजवळ गायी अधिक तो अधिक श्रीमंत.

एक दिवस गायीची पूजा करीत असताना नचिकेत्याने आपल्या आईला विचारले– "आई, गायीची पूजा का ग करतात ?"

"बेटा, गाय आपल्याला दूध देते. दूध घेतल्यानं आपण तेजस्वी होतो. दूध हा सगळ्यात श्रेष्ठ आहार असून गायीपासून तो आपल्याला मिळतो, म्हणून गायीला 'गोमाता' म्हणतात."

"ते सगळं ठीक ग, पण गाय दूध देते म्हणून तिची पूजा का बरं करायची ?"

"अरे, गाईची पूजा करणं, तिला नमस्कार करणं हे आईची पूजा करण्याइतकं पुण्याचं आहे. तिला प्रदक्षिणा घातली की तीर्थयात्रेचं पुण्य मिळतं."

नचिकेत्याला आईचे हे बोलणे म्हणजे काही तरीच वाटले. पटले नाही, तो आईला म्हणाला;

"ठीक, तर आता मला सांग, पुण्याचा लाभ काय ?"

"तू ऐकलेलं नाही ? पुण्यानं स्वर्ग मिळतो. स्वर्ग म्हणजे देवदेवतांचं वसतिस्थान. तिथं सगळ्या प्रकारची सुखं मिळतात."

आईच्या या गोष्टी ऐकून नचिकेत्याला पटकन त्याचा मित्र सोमा याची आठवण झाली. सोमा एक गरीब ऋषिपुत्र होता. नचिकेता म्हणाला, "आई, बिचाऱ्या सोमाकडे एक देखील गाय नाही. ए, आपण आपली एखादी म्हातारी गाय त्याला देऊन टाकायची का ? तो रोज तिची पूजा करील, मग त्यालाही स्वर्ग मिळेल."

विश्ववरा त्याला मध्येच हटकून म्हणाली, "नाही बेटा, असं नाही करू कधी. म्हातारी गाय दान दिल्यानं पाप लागतं. कारण ती दूध देत नाही. त्यामुळे दान घेणाऱ्याला काहीच लाभ मिळायचा नाही. अशी गाय दिल्यानं आपण नरकात जाऊ."

"नरकात मनाला आवडणारी सुखं नाहीत का आई ?" नचिकेत्याने आईला पुन्हा प्रश्न विचारला. आई म्हणाली, "पाप करणाऱ्यांना सुख कुठून मिळणार ? पापी लोकांना यमदेव कठोर, कडक शिक्षा करतात. हे बघ नचिकेता, या सगळ्या गोष्टी शिकून घ्यायच्या म्हणजे खूप अभ्यास करायला हवा बेटा."

नचिकेता ताडकन म्हणाला, "तर आई, मी ताबडतोब अभ्यासाला लागतो."

त्याच क्षणापासून त्याच्या मनात अभ्यासाची तीव्र इच्छा निर्माण झाली.

## मला विद्या हवी

वाजश्रवस यांनाही तेच वाटत होते. त्यांनी शुभ मुहूर्त बघितला आणि नचिकेत्याच्या अभ्यासाला सुरुवात केली. तल्लख बुद्धीच्या नचिकेत्याने काही दिवसातच लहान-लहान वाक्ये लिहिणें शिकून घेतले.

एके दिवशी वाजश्रवस यांच्या कुटीत महर्षी

आचार्यजी आले. लहानग्या नचिकेतासाठी त्यांनी एक आंबा आणला होता. आचार्यांना बघून नचिकेत्याने त्यांना नमस्कार केला व तो त्यांच्या मांडीवर जाऊन बसला. आचार्यांनी त्याच्या हातात आंबा दिला. त्याचा लाड केला. नचिकेता म्हणाला, " मला आंबा नको."

"मग काय हवं बेटा तुला ?" आचार्यांनी विचारले.

"मला विद्या हवी."

"कशी विद्या पाहिजे ?"

"ज्ञान देणारी विद्या."

वाजश्रवसांनी त्याला थोडे दटावले. म्हणाले, "चल आत जा. मोठ्यांच्या गोष्टी ऐकत बसू नये."

नचिकेत्याचा चेहरा उतरला. आत आईजवळ जाऊन तो रडत बसला. आचार्यांना वाईट वाटले. ते म्हणाले, वाजश्रवसजी आपण मुलाला दटावलं, हे चांगलं नाही केलं. अहो, मुलगा किती चांगला



" मला विद्या हवी."

आहे तुमचा ! त्याने आंबा घेतला नाही. विद्या मागितली. आपल्याला आनंद व्हायला हवा होता. मला वाटतं हा कुणी तरी मोठा माणूस होईल. त्याची मौंज करा आणि त्याला विद्याभ्यासाला लावा.

वाजश्रवस गप्प राहिले. आचार्य म्हणत होते, ते खरे होते. ते आचार्यांना म्हणाले, "तुम्ही म्हणता तेच करीन. पण आपल्याला मी एक विनंती करतो. प्रार्थना आहे माझी."

"सांगा काय ती."

"आपल्याच हातून नचिकेत्याचे शिक्षण व्हावे अशी माझी इच्छा आहे."

"अगदी आनंदानं. अहो, इतका उत्तम शिष्य मला आणखी कुठं मिळणार ? अशा शिष्याला विद्या दिल्यानं गुरूचीच कीर्ती वाढते."

तपोवनाच्या कुटीतच नचिकेत्याची मुंज झाली. मुंजीला उपनयन संस्कार म्हणतात. तो संस्कार झाल्यावरच वेदविद्या शिकायचा अधिकार प्राप्त



" मला विद्या हवी."

आहे तुमचा ! त्याने आंबा घेतला नाही. विद्या मागितली. आपल्याला आनंद व्हायला हवा होता. मला वाटतं हा कुणी तरी मोठा माणूस होईल. त्याची मौंज करा आणि त्याला विद्याभ्यासाला लावा.

वाजश्रवस गप्प राहिले. आचार्य म्हणत होते, ते खरे होते. ते आचार्यांना म्हणाले, "तुम्ही म्हणता तेच करीन. पण आपल्याला मी एक विनंती करतो. प्रार्थना आहे माझी."

"सांगा काय ती."

"आपल्याच हातून नचिकेत्याचे शिक्षण व्हावे अशी माझी इच्छा आहे."

"अगदी आनंदानं. अहो, इतका उत्तम शिष्य मला आणखी कुठं मिळणार ? अशा शिष्याला विद्या दिल्यानं गुरूचीच कीर्ती वाढते."

तपोवनाच्या कुटीतच नचिकेत्याची मुंज झाली. मुंजीला उपनयन संस्कार म्हणतात. तो संस्कार झाल्यावरच वेदविद्या शिकायचा अधिकार प्राप्त

होतो. त्यानंतर मुलाला 'वटू' किंवा "ब्रह्मचारी" म्हणतात.

नचिकेत्याची मुंज झाली.

उपनयन संस्कार झाला की विद्यार्थ्याला विद्या शिकायला गुरूच्या घरी जावे लागते. तसा नचिकेता गुरूकडे जायला निघाला. वाजश्रवस त्याला म्हणाले, "बेटा नचिकेता, विद्यावान हो. आपल्या गुरूचं मन दुखेल अशी कुठलीही गोष्ट करू नको. नम्रतेनं गुरुजींची सेवा करून त्यांना प्रसन्न ठेव. विद्या घे."

गुरूच्या घरी विद्यार्थी राहतात, त्याला गुरूकुल म्हणतात. ब्रह्मचारी गुरूकुलात राहूनच अभ्यास करतात. गुरुजींच्या आज्ञेचे, गुरुकुलाच्या नियमांचे पालन करावेच लागते. त्या काळी ब्रह्मचाऱ्याला गुरुकुलात राहून, भिक्षा मागून आपलं भोजन मिळवावं लागत असे.

आपल्या आश्रमातून जाण्यापूर्वी नचिकेता आईकडे परवानगी मागायला गेला. तिच्या पाव-

लांना स्पर्श करून नमस्कार केला आणि म्हणाला, "आई, आशीर्वाद दे."

आपला मुलगा विद्या शिकायला गुरुकुलात जात आहे, हे बघून विश्ववरा आनंदात होती. पण तो आता घर सोडून जात आहे म्हणून तिला दुःखही होत होते. आईची ममता! तिच्या डोळ्यांत टचकन पाणी आले. पण ते आवरीत ती म्हणाली, "बाळा, आजपासून गुरुजीच तुझे आई-वडील. गुरुकुल हेच तुझं घर. ज्ञान देणारे हेच तुझे देव. त्यांची आज्ञा पाळणं हेच तुझं खरं व्रत."

नचिकेता गुरुजीबरोबर निघाला. आई मनात थोडी दुःखी होती. "आपला बाळ गुरुजींच्या आश्रमात कसा राहील-काय करील-काय खाईल-कुठे झोपेल?" असेच विचार तिच्या मनात सतत येत होते. किंचित काळजी वाटत होती. आईच ती!

वाजश्रवस तिला शान्त करीत होते. म्हणत होते, "अगं, उगीच का काळजी करतेस. तुझा

मुलगा आश्रमात घरच्यापेक्षा जास्त आनंदात राहील. चांगला सुखात राहील."

## गुरुकुल भूषण

आई-वडिलांना सोडून नचिकेता गुरुघरी आला. सुरुवाती-सुरुवातीला त्याला आश्रमातील नियम पाळणे कठिण गेले. पण नंतर सवय झाली. हळू हळू सगळे नियम त्याला सोपे वाट लागले. घरची आठवण येईनाशी झाली.

त्याच्या येण्याच्या आधीपासून आश्रमात इतर किती तरी विद्यार्थी होते, पण आश्रमाचे नियम पाळण्यात नचिकेत्याचा क्रमांक पहिला होता. तो सगळ्यांचा आदर्श झाला. तो सगळ्यांच्या आधी पहाटे उठायचा, नदीवर जायचा, स्नान करायचा, संध्या करायचा. सूर्योदयाबरोबर तो वेदाचे पाठ म्हणू लागायचा. गुरूजी उंच आसनावर बसून पाठ शिकवीत. विद्यार्थी खाली चटईवर मांडी घालून बसत. गुरूकडून पाठ घेत.

पाठ झाला की तपोवनात काखेत झोळी घेऊन तेथे राहणाऱ्या इतर ऋषींच्या दारात जावे

लागे. भिक्षा मागावी लागे. भिक्षेत जे मिळेल ते गुरुजींच्या आज्ञेने सगळ्यांच्या सोबत खावे लागे. दुपारी आश्रमातील इतर कामे असत. स्वतःचे कपडे धुणे, पाठशाळा झाडून-सारवून साफ करणे, आपल्या आचार्यांच्या व स्वतःच्या यज्ञासाठी समिधा गोळा करणे, आश्रमातल्या झाडांना पाणी घालणे, गायींना चारा घालणे वगैरे. आचार्यांच्या आज्ञेचे पालन करणे हे नचिकेत्याचे अत्यंत प्रिय काम होते.

"नचिकेता..." असा गुरुजींच्या तोंडून शब्द निघतो न निघतो तोच– "काय गुरुजी" असे म्हणून नचिकेता तडक हजर व्हायचा. तो गुरुजींच्या मुखाकडे बघायचा मात्र, बस गुरुजींचे कोणते काम आहे, हे तो चटकन ओळखून घ्यायचा आणि "होय गुरुजी" असे म्हणून तेथून पळतच निघायचा.

आपले वागणे, व्यवहार यामुळे नचिकेत्याने आपल्या गुरुजींचे मन जिंकून घेतले होते. त्यांना प्रसन्न करून सगळी विद्या शिकून घेतली.

कुठलाही पाठ असो, पहिल्याच सांगण्यात नचिकेता तो शिकून घ्यायचा. रोज नवनवीन पाठ फक्त नचिकेत्यालाच शिकवले जायचे.

अशा एकपाठी शिष्याला शिकवण्यात गुरुजींनाही आनंद व्हायचा. आश्रमात येणारे पाहुणे ऋषी नचिकेत्याला बघून त्याची प्रशंसा करायचे. म्हणायचे, " अहो, हे रत्न आहे रत्न ! अशा मुलाला जन्म देणारे आई-वडील खरोखरच धन्य आहेत. "

## यमराजाविषयी जिज्ञासा

एकदा आश्रमात एक दुःख देणारा प्रसंग घडला. त्यावेळी नचिकेता फक्त बारा वर्षांचा होता. त्याची आवडती कपिला गाय मेली. तिच्या गळ्यात हात टाकून नचिकेता ढसढसा रडला.

आचार्यांनी त्याला समजावले. म्हणाले, " बाळ नचिकेता, अरे, गाय म्हातारी होती. मेली ती. आता रडून काय उपयोग ? जे मरतात ते पुन्हा जिवंत होऊ शकत नाहीत. या जगात प्रत्येकाला एक ना एक दिवस मरावंच लागतं."

"पण गाय तर तीच आहे ना गुरुजी ?"

"हो पण आता हे फक्त तिचं शरीर आहे. तिचे प्राण तर यमराज घेऊन गेले. यमराज ही मृत्यूची देवता आहे."

गुरुजींचे हे बोलणे ऐकताच त्याला आपल्या आईचे शब्द आठवले. तो म्हणाला, "हो गुरुजी, माझी आईसुद्धा हेच म्हणत होती. तेव्हापासून यमराजाला बघण्याची इच्छा होत आहे."

आचार्य हसून म्हणाले : "यमराजाला बघणं इतकं सोपं नाही. कारण यमराजाजवळ जाणं म्हणजे मरणंच. मेलेला प्राणी पुन्हा जिवंत नाही होऊ शकत."

नचिकेता निराश झाला. तरीही अगदी दबक्या आवाजात त्याने गुरुजींना विचारलेच, "गुरुजी, मग यमराजाला बघणं कसं शक्य होईल ?"

"अत्यन्त धैर्यवान तपस्व्यांनाच ते शक्य आहे. बेटा. परंतु तसा प्रयत्न अजूनपर्यंन्त कुणी केला



यमराजाने नचिकेत्य

9399 ६।७।८२
विषय



ा अग्निविद्या दिली.

नाही. हं.... चल, सोड या गोष्टी.... चल.... उठ सूर्यास्त झाला आहे."

आचार्य निघून गेले. नचिकेता उठला. पण त्याचे मन म्हणत होते–कधी ना कधी, कुठल्या ना कुठल्या तऱ्हेनं मला यमराजांना बघायचेच आहे.

दिवस निघून गेले.

**विश्वजित यज्ञ**

इकडे नचिकेत्याचे वडील वाजश्रवस यांनी 'विश्वजित' यज्ञाचा संकल्प केला. यज्ञ करायचे ठरवले. तपोवनातल्या सगळ्या ऋषींना आमंत्रणे धाडली. गुरुकुलात स्वत: जाऊन सर्व ऋषींना आणि आचार्यांना आमंत्रण देताना तें म्हणाले, "आचार्य, यज्ञासाठी आपण आपल्या सगळ्या शिष्यांना घेऊन या. सोबत नचिकेत्यालाही आणा."

ठरलेल्या दिवशी आचार्य आपल्या शिष्यांना घेऊन निघाले. रस्त्यात नचिकेत्याने आचार्यांना

विचारले, "गुरुजी, माझे वडील विश्वजित यज्ञ का करीत आहेत ?"

"वत्सा–बाळा, विश्वजित याचा अर्थ जग जिंकणं. जगातली सगळ्यात श्रेष्ठ कीर्ती आणि स्वर्गात अपार सुख मिळवायला तुझे वडील हा यज्ञ करीत आहेत."

"पण आई तर म्हणाली होती की स्वर्ग मिळावा म्हणून पुण्य करावं लागतं."

"हो बेटा. या यज्ञाने पुण्य प्राप्त होतं. या यज्ञात लक्ष-लक्ष लोकांना अन्नदान करावं लागतं, गायी दान कराव्या लागतात. आपल्याजवळ आहे नाही ते सगळं दान करावं लागतं. यज्ञाचा तोच नियम आहे."

"असं! तर काय-काय दान करावं लागतं गुरुजी ?" नचिकेत्याने चकित होऊन विचारले.

"धन, सोनं, वस्तू, वाहनं अशा कोणत्याही गोष्टी. ज्या वस्तू आपल्या अतिशय आवडीच्या आहेत, पण त्या दुसऱ्याच्याही उपयोगाच्या आहेत, अशा वस्तूंचं दान केलं तर पुण्य अधिक मिळतं."

"गुरुजी, मी माझ्या वडिलांचा लाडका मुलगा आहे. माझंही दान देऊ शकतात का ते?"

आचार्य हसत-हसत म्हणाले, "नचिकेता, अरे, कसा विचित्र प्रश्न विचारतोस तू? तुला दुसऱ्याला दान देऊन टाकण्याची गरजच काय? भिऊ नको. तुझं दान नाही देणार."

सूर्य डोंगराआड जात होता. संध्याकाळ होत होती. आचार्य आणि नचिकेता कुटीपर्यंत येऊन पोचले. नचिकेता धावत धावत आत गेला. आईला नमस्कार केला आणि तिला बिलगला. किती दिवसांनी तो आपल्या आईला भेटत होता.

विश्वजित यज्ञ सुरू झाला. मंगलवाद्ये वाजू लागली. हजारो विद्‌वानांची सभा भरली. शेकडो ऋषी आणि मुनी चर्चा करू लागले. वेदमंत्रांचे घोष घुमू लागले. वाजूच्या दऱ्या-खोऱ्यात आवाज उमटू लागला. आकाशापर्यन्त तो पोचू लागला. वाजश्रवस यज्ञाच्या कामात मग्न होते.

वाजश्रवांचा स्वभाव सगळ्यांना ठाऊक होता. ऋषींनी त्यांना आधीच सांगून ठेवले होते– "वाजश्रवसजी, आपण आपला राग आवरा वरं! यज्ञकाळात आपण जे जे बोलाल ते पूर्ण करा. नाही तर यज्ञ फुकट जाईल. फळ मिळणार नाही."

वाजश्रवस अत्यन्त शान्तपणे कामाला लागले.

**वडिलांनी असे का केले ?**

गायी दान करण्याची वेळ आली. यज्ञ करणाऱ्या पुरोहितांनी त्यांना म्हटले, "दानाची वेळ झाली. दान-दक्षिणा म्हणून गायींना घेऊन या."

वाजश्रवसांनी शिष्यांना सांगून गोशाळेत बांधलेल्या गायी इकडे आणायला सांगितल्या. हजारो गायी यज्ञमंडपाच्या समोर ओळीने बांधून ठेवल्या. नचिकेता तेथे गेला आणि गायींना न्याहाळू लागला. त्यातील काही गायी फार रोड होत्या. अशक्त, मान खाली करून पाणी पिण्याची किंवा चारा खाण्याची शक्तीदेखील त्या गायींच्या मानेत नव्हती. काहींचे दात पडले होते. काही

गायी तर इतक्या दुबळ्या होत्या की, प्रबळ हवेच्या झोताने पडून गेल्या असत्या. त्यात दूध देणारी कुठलीच गाय नव्हती.

ते बघून नचिकेत्याला फार दु:ख झाले. तो विचार करू लागला– "वडिलांनी असं का केलं? निरुपयोगी गायींचं दान करून कुठलं आणि कसं पुण्य मिळणार आहे ? या गायींना कोणीही पाळणार नाही. बहुतेक याच कारणानं आपले वडील अशा गायी दुसऱ्यांच्या माथी मारीत आहेत. स्वर्ग मिळावा म्हणून इकडे हा यज्ञ सुरू आहे. पण अशा निरुपयोगी दानानं स्वर्ग नाही; नरक मात्र मिळेल."

नरकाची आठवण होताच नचिकेता घाबरला. मनात म्हणाला, "नाही, नाही. माझे वडील नरकात नाही जाणार. मी नाही जाऊ देणार. वाचवीन मी त्यांना. पण–पण त्यांना हे मी कसं समजावून सांगू ? माझ्यावर ते रागावतील मी असं म्हटलं तर. तर–तर मी काय करू ?"

नचिकेत्याने खूप विचार केला. पण वेळ अगदीच कमी होता.

**" जा, तुला मृत्यूला दान दिले "**

अखेर त्याला एक उपाय सुचला...... " आवडणाऱ्या वस्तू दानात द्याव्या असा यज्ञाचा नियम आहे. पण वडील प्रिय वस्तू लपवून न आवडणाऱ्याच गोष्टी दान करीत आहेत. त्यात त्यांचा मोह असेल. वडिलांचं सगळ्यात जास्त प्रेम तर माझ्यावर आहे. मला जर त्यांनी दानात देऊन टाकले तर सगळं काही ठीक होईल."

वडिलांचे भले व्हावे म्हणून नचिकेत्याने स्वतः दान म्हणून जाण्याचा निश्चय केला. त्याग यालाच म्हणतात.

तो वडिलांजवळ गेला आणि हळूच म्हणाला : " बाबा, तुम्ही मला कुणाला दान करणार ?"

वाजश्रवस आश्चर्याने आपल्या मुलाकडे बघू लागले. क्षणभर थांबले. त्याला त्यांनी उत्तर दिले

नाही. ते दानाच्या तयारीला लागले. नचिकेता दुसऱ्यांदा म्हणाला, "बाबा, तुम्ही मला कुणाला दान देणार आहात ?"

वाजश्रवस रागावणार होते. पण त्यांनी आपला राग गिळला.

नचिकेत्याला वाटले–आपण म्हणतो ते त्यांना नीटसं कळलं नसेल. म्हणून तो सगळ्यांना ऐकू जाईल अशा मोठ्या आवाजात म्हणाला, "सांगा बाबा, तुम्हीं मला कुणाला दान देणार ?"

हे सगळ्यांनी ऐकले. वाजश्रवस आपला राग आवरू शकले नाहीत. यज्ञातला नियम तोडून ते रागात ताडकन म्हणाले–

"जा मी तुला मृत्यूला दान दिलं आहे."

ऋषिगण घाबरले. मंत्रपाठ थांबले. म्हणाले, "हे काय केलंत वाजश्रवसजी तुम्ही ? नियम तोडलात; रागाच्याभरात तुम्हीं आपल्या पोटच्या मुलाला मृत्यूच्या हवाली केल्याचं म्हणालात. दानाच्या



" जा, मी तुला, मृत्यूला दान दिलं आहे."

वेळी तोंडून निघालेली गोष्ट सत्य होते. बोललेली गोष्ट तावडतोब करा, नाही तर यज्ञ थांबेल."... आता काय होणार ?

वाजश्रवसांना आपली चूक कळली. पण...? त्यांना पश्चात्ताप झाला... "हे देवा, रागाच्या भरात मी हे काय बोलून गेलो. आता काय होणार ? "

त्यांना दुःख झाले, रडू कोसळले. ते आपल्या कुटीत पटकन निघून गेले. यज्ञ थांबला.

विश्ववरा मूर्च्छा येऊन पडली.

नचिकेता कुटीत गेला. आई-वडिलांची ही दशा बघून त्याला फार दुःख झाले.

"···· आपले वडील का दुःखी आहेत, मृत्यूच्या देवतेला माझे दान केले, यात काय मोठं वाईट झालं. मृत्युदेवता तर यमराज आहेत. वडिलांच्या आज्ञेचं पालन करणं तर माझं कर्तव्य ठरेल. यमदेवाकडे गेलो म्हणून काय होणार असं.

मी त्यांच्याही आज्ञेचं पालन करीन. बघू तर यमराज मला कशा आज्ञा करतात ते..."

मनात निश्चय करून तो वडिलांना म्हणाला : "बाबा तुम्ही मुळीच दुःखी होऊ नका. गौतम, अरुणी यांचा पवित्र वंश आहे आपला. ते सगळे सत्यवादी होते. तुम्ही तोंडून काढलेले शब्द खरेच होतील आणि ते झालेच पाहिजेत.

मुलाचे हे बोलणे ऐकून वाजश्रवस धाय-मोकलून रडले. म्हणाले, "बेटा, माझ्या हातून फार मोठी चूक झाली रे !"

"दुःख आवरा बाबा, तुमचे शब्द मीच खरे करून दाखवतो."

## हा कोणता लोक आहे ?

वडिलांची आज्ञा मानून नचिकेता लगेच पद्मासन घालून बसला. त्याने डोळे बंद केले आणि तो मृत्यूदेवतेचे, यमाचे ध्यान करू लागला. ध्यान करण्यात पुष्कळ वेळ निघून गेला. बाहेरचे सगळे जग तो विसरला.

त्याला अचानक वाटले–आपल्याला कुणी तरी बोलावते आहे. नचिकेत्याने डोळे उघडले. तिथे आश्रम नव्हता. वाजश्रवस नव्हते. यज्ञशाळा नव्हती की ऋषिगण नव्हते. नवे जग होते ते. नवा लोक. सुंदर नगर. समोर विशाल महाल, त्याला सोन्याच्या भिंती. हे बघून नचिकेता चकित झाला. त्याला वाटले, आपण कुठं आलो ?

उठून तो समोरच्या महालाच्या मोठ्या दिंडीदरवाज्यापर्यन्त आला. तेथे पहाडासारखे धिप्पाड अंगाचे पहारेकरी उभे होते. काळामिट्ट रंग. मोठमोठ्या मिशा. अक्राळविक्राळ दिसायचे ते. आधी नचिकेता नाही म्हणता थोडा घाबरलाच. पण मोठ्या धैर्याने पुढे गेला आणि त्याने पहारेकऱ्यांना विचारले, " महाशय, आपण कोण आहात ? हा कोणता लोक आहे, कोणते जग आहे हे ? हा महाल कुणाचा ? "

ते म्हणाले, " अहो, ब्रह्मचारीजी, हे संयमिनी नगर आहे. हा महाल यमराजांचा आहे. आपण कसं येणं केलं ? "

"अरे वा, यमराजांचा महाल का ? मग मी धन्य झालो. महाशय, मी वाजश्रवस ऋषींचा मुलगा आहे. नचिकेता म्हणतात मला. मी यमराजांना भेटावं अशी माझ्या वडिलांची आज्ञा आहे. अहो, माझ्यावर कृपा कराल का ? कसंही करून यम-राजांची आणि माझी भेट घालून द्या."

तेथील दोघे आत गेले. परत येऊन म्हणाले, "हे महात्मन्, यमराज बाहेर गेले आहेत, कामाला. त्यांना यायला अजून तीन दिवस लागतील. पण महाराणींचं म्हणणं आहे, आपण आत येऊन स्वागत स्वीकारावं.

पण नचिकेत्याने नकार दिला. म्हणाला, "हे मान्यवरांनो, यमराज जे सांगतील तेच ऐकावं अशी माझ्या वडिलांची आज्ञा आहे. त्यांच्या येण्यापर्यन्त मी इथंच थांबावं, हेच बरं. तोच धर्म ठरेल."

इतके बोलून महालापासून काही अंतरावर नचिकेता जाऊन बसला. पद्मासन घातले आणि तो यमाचे ध्यान करीत बसला.

तीन दिवस निघून गेले. नचिकेता ध्यान लावून बसलेलाच होता. खाणे नाही, पिणे नाही. त्याचे लक्ष ध्यानातून उडले नाही. हीच तपश्चर्या. हे बघून देवलोकातील देवसुद्धा थक्क झाले.

**तीन वर माग**

चवथ्या दिवशी यमराज आले. त्यांना सगळ्या गोष्टी ठाऊक झाल्या. राणी म्हणाली, "घरी आलेल्या पाहुण्यांना उपाशी ठेवणं, योग्य नाही. तुम्ही त्याला पटकन बोलवा."

नचिकेत्याची तपश्चर्या बघून यमराज खूष झाले. त्याच्या समोर गेले नि म्हणाले, "हे ब्राह्मणकुमार!"

त्याने डोळे उघडले. झगझगीत प्रकाशासारखे दिसणारे यमराज त्याच्या समोर उभे होते. त्यांना प्रणाम करून नचिकेता म्हणाला, "हे भगवान यमधर्मा, वडिलांच्या आज्ञेवरून मी इथे आलो आहे. यापुढे मी आपल्याच आज्ञेचं पालन करीन."

यमराजांनी नचिकेत्याला महालात नेले. उंच आसनावर त्याला बसवले. त्याचे पाय धुतले.

दूध, फळे, मध वगैरे देऊन त्याचा सत्कार केला आणि म्हटले, "कुमार नचिकेता, घरी येणारा पाहुणा हा सगळ्यात श्रेष्ठ देव असतो. माझा पाहुणा म्हणून तू आलास आणि तुला तीन दिवस उपाशी रहावे लागले. मला दुःख होत आहे. क्षमा कर मला. माझ्या या अपराधासाठी मला तू तीन वर माग. मी देईन. इच्छा असेल ते माग."

नचिकेता म्हणाला. "यमराजा, आपली कृपा आणि थोरामोठ्यांचे आशीर्वाद मिळावे. यापेक्षा माझी दुसरी कोणतीच मागणी नाही. मी आपली आज्ञा पाळावी, अशी माझ्या वडिलांची मला आज्ञा आहे."

यमराज म्हणाले, "नचिकेता, तू तुझ्या नम्रतेला शोभेल असंच बोललास. पण तुला मी दिलेलं वचन मागे घेऊ शकत नाही. तुला वर मागावेच लागतील. माझी तशी आज्ञा आहे तुला."

विनम्र होऊन नचिकेता म्हणाला, "राग कुठल्याही माणसाला येणं योग्य नाही. रागात

येऊन मनुष्य वाटेल ते बोलतो; करतो. नंतर त्याला पश्चात्ताप होतो. यज्ञ करताना माझ्या वडिलांनी संयम पाळला असता तर त्यांना दुःख भोगावं लागलं नसतं. शान्त स्वभाव होण्यासाठी मनुष्य संतुष्ट असला पाहिजे. यज्ञाचे काम थांबले आहे. त्यामुळे माझे वडील असंतुष्ट आहेत."

"नचिकेत्या, यात काळजी करण्यासारखं काही नाही. एक लक्षात ठेव, तू मरण पावला म्हणून इथं माझ्या घरी आला नाहीस. वाजश्रवस तपस्वी आहेत. त्यांचं वचन खरं करून दाखवायला मी तुला इथं बोलावलं आहे."

**अग्निविद्या**

यमराजा, स्वर्गात देव राहतात असं मी ऐकलं आहे. ते निर्भय असतात. त्यांना म्हातारपण येत नाही आणि देवत्व मिळवायला अग्निविद्या शिकणं आवश्यक आहे. म्हणून मला अग्निविद्या शिकवून द्या. एवढी कृपा करा माझ्यावर."

नचिकेत्याच्या या गोष्टी ऐकून यमराज आश्चर्यचकित झाले–लहानसा हा मुलगा. पण

किती महान विद्या शिकायची याची इच्छा !

यमराज म्हणाले, " नचिकेता तुझ्यात अपार श्रद्धा आहे. आणि इतकी श्रद्धा असणाराच विद्या शिकायला योग्य असतो. मी तुला अग्निविद्या अगदी जरूर शिकवीन."

यमराजाने नचिकेत्याला अग्निविद्या दिली. अखेर म्हणाले, "तू तुझं बुद्धीचं तेज कायम ठेवशील तरच ही विद्या तुझ्याजवळ राहील. वरं, आतापर्यंत मी जे जे शिकवलं ते म्हणून दाखव."

नचिकेता असामान्य बुद्धिमान मुलगा होता. एकपाठी. यमराजाने शिकवलेला शब्द अन् शब्द त्याने म्हणून दाखवला. यमराज म्हणाले, " पुरे झाले. तुझ्या विद्येची आणखी परीक्षा घेण्याची आवश्यकता नाही. तू ज्ञानी झाला आहेस. या आनंदात मी माझ्याकडून तुला एक वर देतो. मी जी तुला विद्या दिली, ती तुझ्या नावानंच– 'नचिकेताग्नी विद्या' या नावानं जगात प्रसिद्ध होईल. नचिकेताग्नीची उपासना करणाऱ्यांना देवत्व प्राप्त होवो ! तुला मात्र आपोआपच देवत्व प्राप्त होईल.

इतके बोलून यमराजाने रत्नांची एक माळ नचिकेत्याच्या गळ्यात घातली,

**आत्मविद्या**

तिसरा वर उरला होता. नचिकेत्याला गुरुकुलाची आठवण झाली. तेथे मेलेली कपिला गाय. आपल्याला झालेले दु:ख आणि आचार्यांचे शब्द त्याला आठवले. हात जोडून जो यमराजांना म्हणाला, "धर्मराजा, जगात जे जे जन्म घेतात ते ते मरतात. पाप-पुण्याच्या बळावर अनेक लोक सुख-दु:ख भोगतात. शरीर नष्ट होते पण आत्मा अमर राहतो. तो अनेक जन्म घेतो, असं अनेक विद्वान म्हणत असतात. त्याचं रहस्य काय? या दु:खापासून दूर होण्याचा काही उपाय नाही का? असेल तर कृपा करून मला सांगा. हीच माझी तिसरी मागणी."

नचिकेत्याच्या या गोष्टी ऐकून यमराज थक्क झाले. या सर्व गोष्टी तर लहान मुलाच्या समजण्यापलिकडच्या आहेत. ते म्हणाले, "नाही बेटा, आणखी दुसरं काही माग. जगात सर्वश्रेष्ठ

राजमुकुट माग, धन माग, मौल्यवान हिरे किंवा दागदागिने माग. पण तू जे मागत आहेस ती तर आत्मविद्या आहे आणि ती देवदेवतांनासुद्धा कळत नाही."

पण नचिकेता आपल्या शब्दावर पक्का राहिला. देवत्व प्राप्त करून देणारी अग्निविद्या मिळाल्यावर आणखी दुसऱ्या सुखाची काय आवश्यकता ? जगातील लोकांच्या भल्यासाठी त्याने आत्मविद्या प्राप्त करायचा दृढ निश्चय केला.

अतिशय नम्रपणे नचिकेता यमदेवाला म्हणाला, "यमधर्मराजा, वर द्यायला आपण वचनाने बांधला गेला आहात. कृपा करून आपण मला आत्मविद्या द्या. ही विद्या देण्यासाठी आपल्यासारखे गुरू इतरत्र कुठेही मिळणार नाहीत.

अखेरीस, नचिकेत्याचा निश्चय बघून त्याला आत्मविद्या देणे यमराजास भाग पडले. त्याच बरोबर यमाने त्याला योगविद्यादेखील शिकविली. देवाचा साक्षात्कार होण्यासाठी ती आव-

श्यक आहे. मानवाच्या कल्याणाची इच्छा मनात धरून यमराज म्हणाले, "कुमार नचिकेता, या जगात मनुष्य जन्म मिळणे हेच तर उत्तम पुण्याचे उत्तम फळ आहे. संतसज्जनांची संगती धरावी, उत्तम विद्या मिळवावी आणि सगळ्यांचे भले करावे हेच खरं पुण्याचं काम आहे. दुष्ट माणसाची संगत करून दुसऱ्यांना कष्ट देणं, दुःख देणं, हे महापाप आहे. वाईट काम केल्यानं दुःख मिळतंच. जो पाप करीत नाही, तोच खरा ज्ञानी पाप करणारा अज्ञानी, असा पाप करणारा अज्ञानी पुनः पुन्हा जन्म घेतो आणि दुःख भोगत राहतो म्हणून म्हणतात–आत्मा अमर आहे. दुःखापासून मुक्त होणं, म्हणजेच मोक्ष आहे. आणि मोक्षाचा रस्ता ईश्वरभक्ती आहे. ईश्वर सगळ्यात मोठा आहे. सर्वशक्तिमान ! परब्रह्म, परमात्मा अशी किती तरी नावानं त्याची पूजा होते. सूर्य, चंद्र, मनुष्य, प्राणी या सगळ्या रूपात ईश्वर प्रकट होत असतो. म्हणूनच आम्ही म्हणतो–ईश्वर सगळीकडे आहे, तो सगळ्यांना समान बघतो. उच्च–नीच असा भेदभाव त्याच्याजवळ नाही.

सगळ्यांचं भलं करणं हे त्यांचं काम आहे. तसंच माणसानंही वागावं. भेदभाव मानू नये. सगळ्यांचं कल्याण होईल, असंच वागावं. तीच देवाची पूजा आहे.

नचिकेत्याच्या बुद्धीत या उपदेशाने ज्ञानाचा सूर्य उगवला. त्याच्या मुखावर तेज आले. अतिशय आनंदाने तो म्हणाला, "यमराजा, आपणास लक्ष लक्ष प्रणाम. नमो नमः"

आणि नचिकेत्याला ज्ञान प्राप्त झाले या शुभ-वेळेला आकाशातून पुष्पवृष्टी झाली.

यमराज म्हणाले, "नचिकेत्या, उठ. आता तू आपल्या वडिलांकडे जा. मिळालेल्या ज्ञानाचा सगळी-कडे प्रसार कर."

—आणि जगातल्या लोकांना ऐकू जाईल इतक्या मोठ्या स्वरात गर्जत ते म्हणाले— "उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्यवरान्निबोधत"

'हे जगात राहणाऱ्या समस्त जन हो, उठा, जागे व्हा. ज्ञानी लोकांकडून ज्ञान प्राप्त करून घ्या. चांगला मार्ग कोणता ते ओळखा.

१३११ दि. ६।११२

## आई-वडिलांजवळ

यमराजाचा हा आवाज सगळ्या जगात घुमला. भारतातल्या तपोवनात पोचला. वाजश्रवस यांच्या यज्ञमंडपापर्यंत हा आवाज येऊन पोचला. आश्रमातले सगळे लोक आकाशाकडे बघू लागले.

वाजश्रवसदेखील बाहेर येऊन बघू लागले. आकाशातून अत्यंत प्रकाशमान असा तेज:पुंज खाली उतरून यज्ञमंडपासमोर स्थिर झाला. त्यातून नचिकेता प्रकट झाला.

" ये बेटा नचिकेता, ये बाळ. मला क्षमा कर " असे म्हणत वाजश्रवस हात समोर करून पुढे धावत गेले आणि त्यांनी नचिकेत्याला मिठी मारली.

विश्ववरा धावून मुलाजवळ गेली.

" बाळा, अरे तुझ्या चेहऱ्यावर हे नवं तेज कुठून आलं बेटा, आणि ही रत्नांची माळ कशी तुझ्या गळ्यात ?

नचिकेत्यानं सगळी कहाणी सांगितली. महर्षींनी नचिकेत्याला अनेक अनेक धन्यवाद दिले. ते म्हणाले, " वाजश्रवसजी, आपण धन्य आहात.

आपल्या पुत्राची तर साक्षात यमधर्मराजांनी प्रशंसा केली. असा पुत्र पोटी येणं हे विशेष पुण्याचं फळ आहे. आपल्या यज्ञाचं फळ दुप्पट झालं. आपल्याला देवत्व प्राप्त झालं. नचिकेत्याने 'नचिकेताग्नी विद्या' मिळवून आम्हा सगळ्यांवर उपकार केले आहेत. आम्हाला तो आता पूज्य झाला आहे.

आत्मविद्या मिळवून बाळ नचिकेता महान ऋषी झाला. त्याची कहाणी वेदात कायम टिकणारी झाली,"

**कठोपनिषद**

नचिकेत्याची ही कथा आमच्या पवित्र वेद-ग्रंथात आहे. कृष्ण यजुर्वेद हा यजुर्वेदाचा एक भाग आहे. कठोपनिषद् त्याचा एक वेदान्त भाग आहे. नचिकेत्याने यमराजाकडून जे वर प्राप्त केले आणि यमराजाने जो उपदेश केला, तो त्यात दिला आहे. लोक या पवित्र उपनिषदाचे आजही पठन करतात. जगातल्या कित्येक भाषांमधून त्याचे भाषान्तर झाले आहे. फक्त भारतातच नव्हे, तर जगातल्या इतर देशातल्या विद्वान लोकांनीसुद्धा या

उपनिषदावर किती तरी ग्रंथ लिहिले आहेत.

बालऋषी नचिकेता हा जगभर प्रसिद्ध आहे, ही आपल्या अभिमानाची गोष्ट आहे. नचिकेता हा आपल्या भारत देशाचा सुपुत्र आहे.

कठोपनिषदात गुरु-शिष्य ईश्वराची प्रार्थना करतात,

ॐ सह नाववतु  
सहनौ भुनक्तु  
सह वीर्यं करवावहै ।  
तेजस्विनावधीतमस्तु  
मा विद्विषावहै ।।  
ओम् शान्तिः शान्तिः शान्तिः

तो परमात्मा आम्हा उभयतांचे (गुरू-शिष्यांचे) मिळून रक्षण करो, आम्हा उभयतांचे मिळून पालन करो. आम्ही उभयतांनी मिळून विद्या-सामर्थ्य प्राप्त करावे. आम्हा उभयतांचे अध्ययन तेजस्वी होवो. आम्हा दोघांच्या मनात द्वेष नसावा व [illegible] ी.

□ □

BVBK-0401311

BVBK-0401311

9392

६

# भगिनी निवेदिता

प्रभु शंकर



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा.क्र. 9392

BVBK-0401312
BVBK-0401312

9392
६९१८२

पुष्प ५

# भगिनी निवेदिता

लेखक
प्रभु शंकर

अनुवादक
मधुकर डांग्रे

BVBK-0401312
BVBK-0401312

भारत-भारती [मराठी संस्करण]
रुईकर पथ, नागपूर—२

**प्रकाशक**
भारत-भारती [मराठी संस्करण] बाल पुस्तकमाला

**प्रभाकर फैजपुरकर**
मंत्री
श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती
रुईकर पथ, नागपूर, महाराष्ट्र

**संपादक, मराठी संस्करण**
सुरेश दत्तात्रेय देशपांडे

पहिली आवृत्ती-जुलै १९८०
दुसरी आवृत्ती-मार्च १९८१

मूल्य रु. २–००

मुद्रक
**दि. भि. धाक्रस**
नाग मुद्रणालय, रुईकर पथ, नागपूर–२

# थोडे उपक्रमाविषयी

आपल्या पूर्वजांचे स्मरण म्हणजे कर्तृत्वाच्या प्रेरणेचा अखंड स्रोत. त्यांच्या जीवनातून आपल्याला नेहमीच बोध आणि मार्गदर्शन मिळत आलेले आहे. केवळ भारतीयांनाच नव्हे, तर जगातील साऱ्या मानवांना आपले हे सांस्कृतिक धन म्हणजे एक कुतूहलाचा विषय आहे.

आपला गौरवशाली इतिहास ज्यांनी निर्माण केला, त्या महान व्यक्तींची जीवनचरित्रे सरळ, सोप्या आणि सहज पद्धतीने सादर करण्याचे कार्य बंगलोरच्या 'राष्ट्रोत्थान परिषदे'ने सुरू केले. कन्नड आणि इंग्रजी भाषांमधून लिहिलेल्या छोटचा-छोटचा पुस्तकांच्या रूपाने हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोचविण्याचे हे कार्य आहे. मुळात ही चरित्रे कन्नड भाषेमध्ये लिहिलेली आहेत.

नागपूरच्या 'श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती'ने या चरित्रांचे मराठी अनुवाद प्रकाशित

करण्याची जबाबदारी स्वीकारलेली असून 'भारत-भारती' (मराठी संस्करण) या उपक्रमाच्या अंतर्गत हे प्रकाशनकार्य चालू आहे.

आपले ऐतिहासिक महापुरुष, ऋषी-मुनी, सम्राट, वीर, योद्धे, साधुसंत, राजनीतिज्ञ, कलावंत इत्यादी साऱ्यांचा समावेश या पुस्तकमालेत आहे.

हा अक्षय ठेवा उमलत्या पिढीच्या स्वाधीन करीत असता त्या कार्यात आपल्यालाही काही वाटा उचलता आला, याबद्दल आम्हाला आनंद वाटतो. आपणासही हा उपक्रम आवडेल आणि आपले सहकार्य या उपक्रमास लाभेल, असा विश्वास आहे.

विनीत

**सुरेश दत्तात्रेय देशपांडे**

संपादक

वा.क्र.9392



आपली भारतीय मायभूमी जेव्हा अनेक अडचणींनी ग्रासली होती, तेव्हा पाश्चिमात्य देशांतील अनेकजण स्वेच्छेने भारताच्या मदतीला धावून आले. कुमारी मार्गरेट नोबल ही त्यापैकी एक. ती आयर्लंडमधून भारतात आली व नंतर निवेदिता नावाने प्रसिद्धी पावली. त्याकाळी आयर्लंडही भारताप्रमाणेच स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी लढत होता.

आयर्लंडच्या चर्चमध्ये धर्मोपदेशक असलेले श्री. जॉन नोबल यांची दोन श्रद्धास्थाने होती. एक परमेश्वर व दुसरे त्यांची मातृभूमी आयर्लंड. जॉन नोबल यांचे पुत्र सॅम्युअल नोबल हेही धर्मोपदेशक होते. मेरी हॅमिल्टन नावाच्या सुन्दर तरुणीशी त्यांचा विवाह झाला आणि या दाम्पत्याच्या पोटी १८६७ च्या ऑक्टोबरमध्ये २७ तारखेला मार्गरेट (नंतर प्रसिद्धीस आलेली भगिनी

आपल्या नातवांची सगळी काळजी घेतली आणि कडक शिस्तीचेही संस्कार त्यांच्यावर केले.

आणखी बराच काळ निघून गेला. मार्गरेटच्या आजा-आजींनी तिला व तिच्या बहिणीला हॅलिफॅक्स कॉलेजात पाठविले. तेथे त्या दोघी वसतिगृहात राहू लागल्या. शिस्त हे त्या वसतिगृहाचे ब्रीद होते. तेथील संपूर्ण जीवन शिस्तबद्ध व चाकोरीबद्ध होते. दोघीही बहिणींना अभ्यासाची आवड होती. मार्गरेटला तर संगीत आणि इतर कला यात खूपच रुची होती. मार्गरेटला प्राणिशास्त्राचीही आवड होती.

**शिक्षिकेचे व्रत**

१८८४ साली मार्गरेट सतरा वर्षाची, आत्मविश्वासाचा प्रत्यय देणारी जबाबदार तरुणी बनली होती. तिचे शिक्षण संपले होते. चिमुकल्या मुलांना शिक्षण देण्याची आकांक्षा तिच्या मनात वसत होती. तिला केन्सविक येथे शिक्षिकेची नोकरी मिळाली. त्यामुळे आनंदित होऊन तिने छोटीशी शिक्षिका म्हणून आयुष्यास सुरुवात केली. पुढे महान शिक्षिका होण्याची ही सुरुवातच होती.

लहान मुले खेळण्यात रमतात तेव्हां त्यांना शिकविणे सोपे काम नव्हे. खेळता-खेळता मुलांना शिक्षण देण्याची हातोटी साधावी लागते. मार्गरेटचे मन या आव्हानाने खेचून घेतले. तिने आपली शिक्षणपद्धती यशस्वीच नव्हे, तर मनोरंजक करण्यासाठी अनेक प्रयोग केले. आणि आश्चर्य म्हणजे १८९२ मध्ये मार्गरेटने आपली स्वत:ची शाळा स्थापन केली. ती खूपच लोकप्रिय झाली. मार्गरेट ही प्रतिभासंपन्न शिक्षिका आहे, अशी धारणा लोकमनात उमटली.

इंग्लंडमधील वेल्स प्रांतातील एक तरुण इंजिनीअर मार्गरेटकडे आकृष्ट झाला. त्यांची मैत्री प्रेमात परिणत झाली. त्यांचा वाङ्-निश्चयही झाला. पण दुर्दैव असे की त्या तरुणाला भयंकर आजाराने बिछान्याशी खिळवून टाकले आणि त्यातच त्याचा अंत झाला. मार्गरेटवर दु:खाचा डोंगर कोसळला. पण तिने स्वत:ला सावरले आणि मोठ्या धैर्याने आपल्या शाळेत व स्वत:च्या अभ्यासात मन अधिकाधिक गुंतवून घेतले.

**गुरू लाभला**

१८९५ हे तिच्या जीवनातील निर्णायक वर्ष. या वर्षी मार्गरेटच्या जीवनाला एकदम नवी दिशा मिळाली.

एका रविवारी मार्गरेटची मैत्रीण, लेडी इझाबेल मार्गेसन हिने मार्गरेटला स्वतःच्या घरी, एका भारतीय संतमहात्म्याच्या भेटीसाठी आमंत्रण दिले. त्या भेटीचा प्रसंग मार्गरेटने स्वतःच वर्णिला आहे.

"जमिनीवर पालखट मांडून बसलेला, भगव्या रंगाची वस्त्रे परिधान केलेला, कमरे-भोवती लाल रंगाचे उपरणे गुंडाळलेला, एक भव्यदिव्य पुरुष मी पाहिला. जमलेल्या मंडळींशी बोलताना हा महापुरुष आपल्या एकसुरी पण अंतःकरणातून उमटणाऱ्या आवाजात संस्कृतवचने उद्धृत करीत होता. त्याची ती धीर-गंभीर मुद्रा, त्याचे राजस व्यक्तिमत्त्व आणि परतत्त्वाला स्पर्श करून येणारा त्याचा आवाज यांनी जम-लेल्या सगळ्यांवरच मोहिनी घातली. अधून-मधून हा महापुरुष, 'शिव-शिव' असे शब्द उच्चारीत

असे, त्यामुळे तर एकूण वातावरणच धीरगंभीर, भव्यदिव्य होऊन गेले होते."

मार्गरेटला त्यात नवीन असे काहीच वाटले नाही. कारण तिने यापूर्वीही पौर्वात्यांच्या पावित्र्याची महती ऐकली होती व त्यात खूपखूप अवगाहन केले होते. पण स्वामीजींचे व्यक्तिमत्त्व हे मात्र तिला एकदम नवीन होते.

मग मार्गरेटला कळले की हे स्वामीजी म्हणजे दुसरे तिसरे कुणी नसून स्वामी विवेकानंदच आहेत: हेच १८९३ साली शिकागो येथील आंतरराष्ट्रीय धर्मपरिषदेला आगंतुकपणे हजर राहिले होते आणि यांनीच आपल्या मेधावी वक्तृत्वाने लाखो अमेरिकनांची अंत:करणे भारून टाकली होती.

**जागे व्हा !**

स्वामीजी जे काही सांगत आहेत, त्यात नवीन काहीच नाही, असे मार्गरेटने प्रथम म्हटले खरे; पण ते तितकेसे बरोबर नाही याची नंतर तिला मनोमन खात्री पटली. 'परमेश्वर हेच

एकमेव सत्य आहे,' ह्या स्वामीजींच्या आत्मविश्वासपूर्ण वचनाची तिला वारंवार आठवण होई, एवढेच नव्हे, तर तिचे मन त्या वचनाने भारावले होते. स्वामीजींचा तो विश्वास नवा नसेलही, पण त्यामागील त्यांची निष्ठा निश्चितच नवीन होती. स्वामीजींनी दुसरेही एक ठाम विधान केले होते. "प्रत्येकच धर्म ईश्वराकडे जाण्याचा राजमार्ग आहे."

आणि स्वामींचे ते तेजस्वी व्यक्तिमत्त्व ! त्यांच्याभोवती खरोखरीच दैदिप्यमान असे तेजोवलय होते. त्यांनी ईश्वरासाठी सर्वस्वाचा त्याग केला होता. त्यांची वचने म्हणजे जुन्या धर्मग्रंथातील वाक्यांचा केवळ पुनरुच्चार नव्हता. चैतन्याने ओथंबलेले त्यांचे शब्द आत्म्याच्या गर्भागारातून उमटायचे. त्यांनी पाहिलेल्या व अनुभवलेल्या सत्याचा त्यातून साक्षात प्रत्यय यायचा.

मार्गरेट दिवसेंदिवस स्वामीजींकडे अधिकाधिक वेधली जाऊ लागली. कडाडणाऱ्या विद्युल्लतेने शतकानुशतकाच्या धर्मभोळ्या कल्पनांना भडाग्नी

द्यावा व नवा मार्ग दाखवावा; असंख्य वर्षांच्या अज्ञानाचा खडकासारखा अंधकार छेदीत छिन्नीने आपला मार्ग तयार करून घ्यावा; महान् गुरूच्या मंत्रदीक्षेने शिष्याचे मन निद्रेतून व मरगळीतून बाहेर यावे आणि त्याला आत्मसाक्षात्कार व्हावा; ईशस्पर्श झालेल्या गुरूच्या गूढ वचनांनी शिष्याचा संशयनिरास व्हावा; जीवश्चकंठश्च मित्राने प्रामाणिकपणे केलेला नि:स्वार्थ उपदेश कानी पडावा; अगर वत्सल मातेच्या ममतेने मनाला हळुवार सुखाची लहर स्पर्शून जावी; तसे स्वामीजींच्या अंत:करणाच्या गाभाऱ्यातून उमटलेले ते शब्द ऐकून तिचे मन उजळून जाई. "स्वामीजींचे निष्कलंक चारित्र्य, त्यांच्या चैतन्याची अकलंकित दीप्ती, या गुणांनी माझे अंत:करण वेधून घेतले आणि त्यांच्यासाठी मी त्यांच्या मातृभूमीची सेवक बनले" असे मार्गरेटनेच नंतर नमूद करून ठेवले आहे.

एके दिवशी प्रवचनाच्या ओघात, स्वामीजी घनगंभीर शब्दांत म्हणाले, "या जगात एका परमेश्वराशिवाय माझे दुसरे काहीही नाही, असे

भररस्त्यात उभे राहून घोषित करणारी संन्यस्त वृत्तीची २० माणसे (पुरुष व महिला) या जगाला हवी आहेत. इथे बसलेल्या श्रोतृवर्गात अशी घोषणा करू शकणारा कुणी आहे काय ?"

'मी आहे,' मार्गरेटचे मन पुटपुटले. पण तिच्या भित्र्या, लाजऱ्या वाणीतून मात्र प्रकट शब्द उमटला नाही. एके दिवशीच्या प्रवचनात, भारतातील महिलांबाबत बोलताना स्वामीजी म्हणाले, "तेथे राहणाऱ्या मुलींना शाळेचे दर्शनही घडलेले नाही. जोवर त्या सुशिक्षित होत नाहीत, तोवर, त्या देशाची प्रगती होऊच शकत नाही" आणि लगेच मार्गरेटकडे वळून स्वामीजी म्हणाले, "माझ्या देशातील शिक्षण आणि महिलांचे कल्याण याबाबत माझ्या काही निश्चित योजना आहेत. त्या योजना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी तुझी सेवा खूपच उपयुक्त ठरेल, असा मला विश्वास वाटतो."

स्वामीजींचा आपल्यावरील विश्वास पाहून मार्गरेटचे मन उचंबळून आले. पण एवढ्या भव्य कार्यासाठी आपण लायक आहोत काय ? असा तिच्या मनात संशय होता. मार्गरेटच्या अंतर्मनीची



" तुझी सेवा भारतीयांना खूपच उपयुक्त ठरेल, असा मला विश्वास वाटतो."

अवस्था हेरून स्वामीजी तिचा विश्वास दृढ करीत म्हणाले, "हे जग हलवून सोडण्यासाठी लागणारे मूलभूत गुण तुझ्यात आहेत आणि इतर गुण तुला सहज प्राप्त होतील–तरी उत्तिष्ठत, जाग्रत–हे महान महिले, जागी हो"

मार्गरेटने आपली प्रिय मायभूमी सोडण्याचा आणि मैलोगणती दूर असलेल्या श्री. विवेकानंदांच्या देशाला आपली मातृभूमी मानण्याचा, तसेच तेथील लोकांची मनोभावे सेवा करण्याचा धैर्यशाली निर्णय घेतला.

मनाची तयारी करणे इतके सोपे थोडेच होते ? स्वामीजींनी तिच्यापुढे भारताचे शब्दचित्र हुबेहुब उभे केले होते. स्वामीजींच्या शब्दांनी तिला भारताचे विविधांगी दर्शन घडविले होते. दारिद्र्य, अज्ञान, असूया आणि अस्वच्छता–यांचा भारतात सर्वत्र बुजबुजाट झाला होता. शिवाय तेथील ब्रिटिश राज्यकर्ते आपल्याला पाण्यात पाहतील. अन् भारतीय लोक आपल्याकडे संशयाने पाहून आपला तिरस्कार करतील असे तिला वाटायचे. कारण स्वतःच्याच देशबांधवांना

अस्पृश्य समजणारे लोक ज्या देशात आहेत, अशा देशातील महिलांची सेवा करण्यासाठी आणि मुलांना शिक्षण देण्यासाठी मार्गरेटला आवाहन करण्यात आले होते.

तेथील महिला इतक्या सनातनी अन् कूप-मंडूक वृत्तीच्या, की त्या तर आपल्याला उंबरठाही ओलांडू देणार नाहीत. शिक्षणाचाही तोच प्रकार. तेथील लोक आपल्या लाडक्या मुलींना, वेगळ्या धर्मावर श्रद्धा असलेल्या परकीय शिक्षिकेकडून शिकायला कधीतरी परवानगी देतील काय? अशा संशयास्पद स्थितीत मार्गरेटचे मन आंदोलने घेत असतानाच स्वामीजींकडून तिला धीर देणारा पुढील संदेश आला. "आम्हाला पुरुषाची नव्हे, तर महिला सेविकेची गरज आहे. भारतीयांच्या आणि विशेषत: महिलांच्या सेवेसाठी आम्हाला सिंहिणीसारखा पराक्रम करू शकणारी महिला हवी."

"भारतात थोर महिलांची निर्मिती होण्याचा काळ अद्याप आलेला नाही. आणि तोवर आम्हाला इतर देशांकडून उधार उसनवार घ्यावेच

लागेल. तुझे शिक्षण, कार्यनिष्ठा, शुद्धचरित्र, अपार ममता, निर्धार आणि त्याहीपेक्षा अधिक म्हणजे तुझ्या नसानसात खेळणारे आयरिश रक्त, यामुळे भारताला तुझ्यासारख्या महिलेची–नव्हे, तुझीच गरज आहे."

"तरीही, नव्या कार्यक्षेत्रात उडी घेण्यापूर्वी तू सर्व बाजूंचा विचार केला पाहिजेस. नव्या कार्यासाठी सगळे कष्ट उपसल्यावरही तुला यश आले नाही आणि तू नाउमेद झालीस, तर त्या मन:स्थितीत तू वेदांताची कास धरली तरी किंवा वेदांताचा त्याग केला तरी आणि भारताची सेवा करण्याचे व्रत सोडून दिले तरीही मी तुझ्या पाठीशी उभा राहीन, असे तुला अभिवचन देतो. हत्तीचे बाहेर आलेले सुळे (दात) पुन्हा आत जात नसतात. त्याचप्रमाणे माझे शब्दही कधी माघारी फिरणार नाहीत."

### भारतीय भूमीवर

१८९८ च्या जानेवारीच्या २८ तारखेस, मार्गरेटला घेऊन येणारी बोट कलकत्ता बंदरात नांगरली. मार्गरेटचे स्वागत करण्यास स्वामी

विवेकानंद जातीने बंदरावर हजर होते. मार्गरेट लवकरच शहरी जीवनात रुळली आणि ज्या लोकांबरोबर जीवन कंठायचे व ज्यांच्यासाठी कार्य करायचे त्यांची ओळख करून घेण्यास तिने सुरुवात केली. तिने मुळीही वेळ न गमावता सर्वप्रथम बंगाली भाषा अवगत केली व बंगाली साहित्याचा अभ्यास आरंभिला. अवतीभवतीच्या लोकांचा विश्वास आणि माया संपादन करण्यासाठी आणि त्यांच्याशी विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी बंगाली भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यकच होते.

काही आठवड्यानंतर स्वामी विवेकानंदांच्या दोन अमेरिकन शिष्या, श्रीमती सारा सी. बुल आणि कु. जोसेफाइन मॅकलिऑड ह्याही भारतात आल्या. मग त्या तिघी जीवश्च कंठश्च मैत्रिणी बनल्या.

त्यांची झोपडी हा आश्रमच बनला. स्वामी विवेकानंद तेथे दररोज, कधी एकटे तर कधी आपल्या संन्यासी बंधुगणांसह यायचे. स्वामीजींनी पाऊल ठेवताच, ती झोपडी ईश्वरी चैतन्याने उजळून निघायची. अंगात तेजाचा संचार झाल्यागत

स्वामीजी आपल्या शिष्यांपुढे तासन्तास बोलत राहायचे. भारत, भारताचा इतिहास, भारतीय संत, वीरपुरुष, वीरांगना, महाकाव्ये, पुराणे, भारतीय कवी, वास्तुशास्त्रज्ञ, शिल्पकार आणि त्याहीपेक्षा पलीकडे म्हणजे भारतीय ऋषी हा स्वामी विवेकानंदांच्या प्रवचनांचा विषय असे.

एके दिवशी कु. मॅकलिऑडने विचारले, "स्वामीजी, तुमच्या सर्वंकष सेवेसाठी मी काय करावे ?"

स्वामीजी तत्काळ उत्तरले, "भारतावर प्रेम कर, या मायभूमीची सेवा कर, तिची पूजा कर. तीच प्रार्थना, तीच खरी भक्ती, तीत सर्व काही आले."

स्वामीजींचे हे उत्तर हा आपल्यासाठीही संदेश आहे, असे मार्गरेटच्या मनावर बिंबले.

**निवेदिता**

दक्षिणेश्वरचा देवपुरुष श्रीरामकृष्ण परमहंस हे स्वामी विवेकानंदांचे गुरू. ते १८८६ मध्येच अनंतात विलीन झाले होते. परमहंसांच्या साध्वी

पत्नी, श्रीशारदादेवी यांना परमहंसांचे अनुयायी भक्त 'पूजनीय माताजी' मानीत. माताजीही सगळ्यांना आशीर्वाद देत आणि पवित्र व कल्याण-कारी कार्य करण्यासाठी उत्तेजन देत.

पूजनीय माताजींना भेटण्यास, मार्गरेट अधीर झाल्या होत्या. पण संशयाची बोचणीही तिच्या मनाला डाचत होती. आपण केवळ परकी-यच नव्हे तर म्लेंच्छ आहोत आणि आपल्या निष्ठाही वेगळ्या आहेत, तेव्हा भारतीय सनातनी रीतिरिवाजात वाढलेल्या माताजी आपले व आपल्या मैत्रिणींचे स्वागत करतील की नाही, अशा शंकेची चुटपुट मार्गरेटच्या मनाला लागून गेली. पण श्रीशारदादेवी म्हणजे ममता आणि पावित्र्याची जणू मूर्तीच होत्या. त्यांनी मार्गरेट, सारा बुल आणि मॅकलिऑड यांचे, आपल्या मुलींप्रमाणे स्वागत केले.

२५ मार्च १८९८ हा मार्गरेटच्या जीवना-तील सर्वाधिक पवित्र आणि अविस्मरणीय दिवस ठरला. हाच तो दिवस की ज्या दिवशी तिच्या

गुरूंनी मार्गरेटचे जीवनपुष्प ईश्वराच्या पूजेसाठी आणि भारताच्या सेवेसाठी वाहून टाकले.

तो शुक्रवार होता. स्वामी विवेकानंदांनी तीनही शिष्यांना मठात नेले. मार्गरेट सर्वात पुढे होती. ती मंदिरात गेल्यावर स्वामींनी ठरलेल्या सोपस्कारानुसार भगवान शंकराची पूजा कशी करावी हे तिला शिकविले. नंतर कुणाच्याही मदतीशिवाय तिच्याकडून सांगोपांग पूजा करवून घेतली. इष्ट देवतेचे पूजन करण्याची रीती गुरूकडून शिकायला मिळणे ही शिष्यावरील अनन्य कृपाच होय. या पूजेचे वेळीच मार्गरेटची तंद्री लागली आणि त्या अवस्थेतच स्वामीजींनी तिला ब्रह्मचर्याची शपथ देववून शिष्यत्व प्रदान केले. याचवेळी मार्गरेटला 'निवेदिता' हे नामाभिधान देण्यात आले. निवेदिता म्हणजे निष्ठावान. भगवान बुद्धाच्या चरणावर कमळाची फुले वाहण्यास स्वामीजींनी निवेदितेला सांगितले आणि नंतर धीर गंभीर आवाजात त्यांनी शिष्येला आशीर्वाद देऊन पुढील संदेश दिला : " जा माझ्या कन्यके, जा. ज्या आत्म्याने बुद्धजन्म प्राप्त करण्यापूर्वी

पाचशे जन्म घेतले, जो शुद्ध प्रेमाचा आणि नि:स्वार्थ त्यागाचा मूर्तिमंत आविष्कार होता, त्या महान बुद्धात्म्याने जो मार्ग अनुसरला त्याच मार्गाने तूही जा."

**ती शाळा : एक प्रयोग**

१८९८ च्या नोव्हेंबरच्या तेरा तारखेस निवेदितेने एका किरायाच्या झोपडीत आपली चिमुकली शाळा सुरू केली. निवेदितेच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पाहाणारांवर प्रथमक्षणीच पडत असे. तिच्याबद्दल आदर वाटावा असे देखणे शरीर, तिच्या अंगावरील हिमशुभ्र पायघोळ झगा, कमरेभोवती आवळलेला रेशमाचा पट्टेवजा कसा, यामुळे तर तिच्या नैसर्गिक रुबाबदार आणि मनोहारी व्यक्तित्वाला शाही ऐश्वर्याची झालर लागून जात असे. गळ्यातील रुद्राक्ष माळेने तिच्या साधुत्वाची खूण पटत असे. जेव्हा निवेदिता एखाद्या जाहीर समारंभात व्याख्यानासाठी जात असे तेव्हा लोक उत्स्फूर्तपणे उभे राहून तिला अभिवादन करीत असत.






मार्गारेट नोबल ' निवेदिता ' झाली

९३९२ / दि. ६।१।८२

शाळा तर सुरू झाली पण विद्यार्थिनी कशा मिळवायच्या हा निवेदितेला पेच पडला. ती दारोदार गेली आणि मुलींच्या पालकांशी चर्चा करून, मुलींना शिक्षण देण्याबाबत त्यांच्या मनात जे दूषित पूर्वग्रह होते ते नाहीसे करण्याचे प्रयत्न तिने केले. "मुलींना शाळेत घालायचे, मोठी नवलाची कल्पना आहे," असे उद्‌गार पालकांच्या तोंडून ऐकू आले. अनेकांनी तर निवेदितेची मस्करी केली. पण या विरोधाला न जुमानता निवेदितेने नेटाने आपला प्रयत्न चालूच ठेवला व अखेर निरनिराळ्या वयाच्या काही मुली विद्यार्थिनी म्हणून मिळविण्यात तिला यश आले. तिने या मुलींना लिहावाचायला शिकविले. तसेच चित्रकला, रंगचित्रकला आणि मातीची बाहुली व शिल्पे तयार करण्याचे शिक्षण दिले.

अवतीभवतीच्या लोकांवर निवेदितेचे निरतिशय आणि सखोल प्रेम होते. त्यामुळेच सुरुवातीचा विरोध मोडून पडला आणि निवेदितेला आजूबाजूंच्या घरात व लोकांच्या अंतःकरणात प्रवेश मिळविण्याचा मार्ग मोकळा झाला. निर-

निराळ्या कुटुंबात सहजतेने वावरणारी निवेदिता हळूहळू त्या कुटुंबांचा घटक बनून गेली. कलकत्ता शहराच्या उत्तरभागात तर निवेदितेला सगळे जण 'भगिनी निवेदिता' म्हणूनच संबोधू लागले.

एकदा एक दुर्दैवी माता आक्रोश करीत आणि हुंदके देत आली व रडत ओरडत निवेदितेला म्हणाली, "लवकर चल. माझं अखेरचं मूल जीवनाची अखेरची घटका मोजीत आहे." निवेदिता धावतच त्या बाईचे घरी गेली पण ती पोचण्याआधीच त्या मुलाचे प्राण कुडीतून बाहेर निघून गेले होते. त्या शोकविव्हल मातेने आपल्या मृत बालकाला उराशी धरले व ती अनेक तास विलाप करीत राहिली अखेर तिने निवेदितेलाच मिठी मारली आणि म्हणाली, "सांग, आता मी काय करू? माझा तान्हुला कुठे गेला?" आपल्या सांत्वनपर वाणीने निवेदितेने त्या मातेला धीर दिला व म्हणाली, "आता शोक करू नकोस. तुझा बाळ थोरल्या आईकडे गेला आहे. तो आता कालीमातेच्या कुशीत आहे."

निवेदितेने ही घटना स्वामीजींना सांगितली तेव्हा स्वामीजींनी तिला जो धीराचा संदेश दिला तो असा : "मृत्यूचीही पूजा कर, निवेदिते जे भयानक असेल त्याचीही, सौंदर्याची करतेस तशीच पूजा कर." निवेदितेने स्वामींचा हा संदेश अंतःकरणावर कोरून घेतला आणि तिला कळून आले की मृत्यू म्हणजे दुसरे काही नसून जीवनाच्या चेहऱ्याची मागील बाजू आहे. आणि हा तिला झालेला नवा साक्षात्कार खरा की खोटा याची कसोटी लागण्याचा प्रसंगही लवकरच आला.

**कलकत्त्यात प्लेग**

१८९९ च्या मार्चमध्ये कलकत्त्यात प्लेगाची लागण झाली आणि हां हां म्हणता ही साथ शहरभर पसरली.... दररोज शेकडो माणसे मृत्युमुखी पडू लागली. निवेदिता दुःखमग्न स्थितीतही मदतीसाठी धावली. लोकांचे प्राण वाचविण्यासाठी तिने रस्ते झाडणे, नाल्या साफ करणे आदी कामे करण्यासही मागेपुढे पाहिले नाही. बंगाली तरुणांना शारीरिक श्रमाचे कोणतेही काम करण्याची सवय नव्हती, त्यातही झाडझुडीचे काम अतिशय

नीच श्रेणीचे, असे त्यांच्या मनावर संस्कार होते. निवेदिता कामे करायची व बंगाली तरुण नुसते बघायचे. महिलांना त्या गोष्टीची लाज वाटायची व त्या स्वतःला घरात कोंडून घ्यायच्या पण अखेर त्यांनाही उपरती झाली आणि सर्वांनी कंबर कसून भगिनी निवेदितेच्या मदतीसाठी स्वच्छतामोहिमेत भाग घेतला. अशा रीतीने निवेदितेने कलकत्त्याच्या लोकांना स्वच्छतेचा, स्वावलंबनाचा आणि समाजसेवेचा पहिला धडा प्रवचनाने नव्हे तर प्रत्यक्ष कार्याने शिकविला.

निवेदितेने प्लेगच्या साथीशी संघटित लढा देण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांची समिती बनविली. निष्ठावान कार्यकर्त्यांच्या तुकड्या शहराच्या सर्व भागात पसरल्या. रस्ते व बोळी स्वच्छ करण्याबरोबरच प्लेगाची लागण झालेल्यांची सेवा करण्याचे कार्य सुरू झाले. निवेदिता रात्रंदिवस झटत राहिली. रोजचे जेवण आणि विश्रांती यासाठीही तिला वेळ मिळत नसे आणि त्यामुळेच तिची प्रकृती एकाएकीच ढासळली.

निवेदितेने आणि तिच्या सहकाऱ्यांच्या चमूने दिवसरात्र कार्य करून तीस दिवसानंतर प्लेगवर विजय मिळविला. असे करताना निवेदितेने स्वत:चे प्राण धोक्यात घालून शेकडो लोकांना मृत्यूच्या दाढेतून ओढून काढले.

महिनाभराच्या या कालावधीत निवेदिता दूध आणि फळांच्या आहारावर जगली. एकदा तर प्लेगच्या रोग्याला औषध देण्यासाठी पैसा हवा म्हणून तिने दुधाच्या आहाराचाही त्याग केला.

**निवेदितेची पश्चिमयात्रा**

निवेदितेची शाळा आर्थिक मदतीच्या अभावी लंगडत-अडखळतच सुरू होती. विद्यार्थिनींना शाळेत आणणे हेच जिथे कष्टाचे काम होते तिथे शाळेसाठी पैसा उभा करणे अशक्यच. त्यामुळे शाळेसाठी पुरेशी सोय केल्यानंतर निवेदितेजवळ जेमतेम पोटापुरती रक्कम उरत असे. अशा वेळी या देशात काम करण्यासाठी लागणारा पैसा पाश्चिमात्य राष्ट्रांकडून मागणे योग्य होईल काय असा विचार निवेदितेच्या मनात आला. तेव्हा तिने स्वामीजींचा सल्ला मागितला. स्वामींनी होकार



निवेदितेने स्वत:चे प्राण धोक्यात घालून शेकडो लोकांना मृत्यूच्या दाढेतून ओढून काढले.

दिला तेव्हा निवेदितेच्या मनावरील भार जरा कमी झाला. १८९९ च्या जूनमध्ये निवेदिता जहाजाने पश्चिमेच्या दौऱ्यावर निघाली. ती युरोपातून अमेरीकेतही गेली. आपल्या छोटचाशा शाळेसाठी पुरेसा पैसा मिळविणे एवढाच तिचा उद्देश होता. पण अमेरिकेत आल्यावर तिच्या हे लक्षात आले की भारत आणि भारताची उज्ज्वल संस्कृती याबद्दल अमेरिकेलाच माहिती देणे आवश्यक आहे.

भारत आणि भारतातील धर्म यांच्या-बद्दल अनेक ख्रिस्ती मिशनऱ्यांनी अमेरिकेत खोटा व बदनामीकारक प्रचार केला होता. भारतातील दारिद्र्य, अज्ञान, धर्मभोळेपणा यांचे चित्र अवा-स्तवपणे रंगवून भारताबद्दल पाश्चिमात्य लोक-मानसात घृणा निर्माण होईल असा पद्धतशीर प्रचार करण्यात येत होता. धर्मोपदेशकांनीच अशा धर्मबाह्य मार्गाचा अवलंब करणे म्हणजे येशूख्रिस्ता-विरुद्धच आवाज उठविणे होय, अशी निवेदितेची धारणा होती. म्हणूनच निवेदितेने आपल्या गुरुं-प्रमाणेच अमेरिकेचा झंझावाती दौरा करून मोठ-

मोठ्या शहरात आणि गावात प्रचंड जमावासमोर भाषणे दिली आणि अमेरिकन जनतेला भारतातील खरी परिस्थिती अवगत करून भारताचा उज्ज्वल भूतकाळ, भारतीय संस्कृतीचा आणि अध्यात्माचा वारसा याची माहिती देऊन भारताच्या सध्याच्या अवनतीचीही कारणमीमांसा केली. निवेदितेला अमोघ वक्तृत्वाची देणगी लाभली होती. तिने भारताच्या इतिहासात, धर्मात आणि पुरातन ग्रंथात अवगाहन केले होते. आपल्या प्रभावी वाणीने, सत्य वचनांनी आणि प्रामाणिकपणाने निवेदितेने भारतीय जीवनाचे बहुरंगी दर्शन अमेरिकेस घडविले. धर्माच्या नावाखाली खोटारडेपणा करणाऱ्या मंडळींनी आपणाला आतापर्यंत चुकींची माहिती देऊन फसविले व आपण फसलो याबद्दल निवेदितेची भाषणे ऐकल्यानंतर अमेरिकन जनतेला खेद वाटला आणि त्यांनी भारताचे सत्य दर्शन घडविल्याबद्दल निवेदितेला धन्यवाद दिले.

दीर्घकालीन परकीय राजवटीमुळे भारताची अवनती झाली, हे सत्य अमेरिकेला पटवून देण्यात निवेदितेला यश आले. पण आपल्या शाळेसाठी

व भारतातील कार्याकरिता भरपूर निधी गोळा करण्याच्या कामी मात्र निवेदितेला पुरेसे यश मिळाले नाही.

**स्वामीजी अनंतात विलीन**

निवेदिता १९०१ मध्ये भारतात परतली.

आता बोसपाडा बोळातील घर क्रमांक १७ मध्ये निवेदिता वास्तव्य करू लागली व त्याच वास्तूत तिने आपली शाळा थाटली. निवेदितेचे निवासस्थान म्हणजे त्या काळातील बुद्धिमंत लोकांचे आणि स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या राजकीय नेत्यांचे विश्रामकेन्द्रच बनून गेले.

याच काळात जर्मनीतील एक तरुणी, कुमारी ख्रिस्तिन ग्रीन्सटायडेल ही भारताची सेवा करण्यास आली व निवेदितेची सखी बनली. ख्रिस्तिनचे सहकार्य निवेदितेला मोलाचे ठरले.

निवेदितेच्या शाळेचे कार्य नव्या जोमाने सुरू झाले. आता तर केवळ मुलीच नव्हत, तर त्यांच्या माताही शाळेत शिकायला येऊ लागल्या. शाळेचा खर्च चालविणे निवेदितेला फारच जड

जाऊ लागले. निवेदितेप्रमाणेच ख्रिस्तिनलाही हलाखीशी सामना करावा लागला. पण अविचल निर्धाराने त्यांनी आपला लढा चालूच ठेवला आणि मुली व महिला यांच्या शिक्षण देण्याच्या कार्यात खंड पडू दिला नाही.

१९०२ हे निवेदितेच्या आयुष्यातील गडद अंधकाराचे वर्ष. २९ जूनला निवेदिता आपल्या गुरूंना भेटायला बेलूर मठात गेली होती. संवादाच्या ओघात स्वामीजी म्हणाले, "उग्र तपश्चर्या आणि समाधि–अवस्थेचा माझ्यावर पगडा बसत आहे. मी मृत्यूला सामोरा जाण्यास सिद्ध होत आहे." २ जुलैला एकादशी होती. त्या दिवशी आपल्या गुरूला भेटण्याची तीव्र इच्छा निवेदितेच्या मनात उफाळून आली. तिच्या आगमनाची वार्ता मठात पसरली, तेव्हा स्वामीजींचे अंतःकरण आनंदाने भरून आले. स्वामीजींना उपवास होता. पण त्यांनी निवेदितेसाठी जेवण तयार करायला सांगितले व स्वतः निवेदितेला वाढले. जेवण होताच स्वामीजींनी स्वहस्ते तिच्या हातावर पाणी घातले आणि निवेदितेने नकार दर्शविला तरी

टॉवेलाने तिचे हात पुसले. या घटनेने निवेदितेच्या अंतर्यामी वेदनेची कळ उठली व ती लाजऱ्या-बुजऱ्या पण तक्रारीच्या सुरात कुजबुजली, "स्वामीजी, मी आपली अशी सेवा करणे हेच इष्ट झाले असते, आपणाकडून मी अशी सेवा घ्यायला नको."

स्वामीजी उद्गारले, "येशूने आपल्या शिष्य-वरांचे पाय धुतले होते, खरं की नाही ?"

"खरं; पण ते येशूच्या अवताराचे अंतिम क्षण होते," असे उत्तर देण्याचा विचार निवे-दितेच्या मनात उमटला, पण शब्द फुटले नाहीत.

त्या दिवशी स्वामीजींचे संपूर्ण व्यक्तिमत्त्वच ममतेने न्हाऊन निघाले होते. त्यांनी आपल्या निवडक शिष्यांवर कृपेचा वर्षाव केला. त्यामुळे निवेदिता इतकी सुखावून गेली की तिच्या अंतर्म-नातील व्यथेचाही तिला विसर पडला. स्वामी-जींच्या कृपेने कृतकृत्य होत्साती, निवेदिता स्वगृही परतली.

आपल्या गुरूशी ही आपली अखेरचीच भेट होय, याची बिचाऱ्या निवेदितेला अस्फुटशीही कल्पना आली नाही. परंतु स्वामींनी केलेली निवेदितेची सेवा आणि दिलेला ख्रिस्ताचा दाखला अनाठायी नव्हता.

१९०२ च्या ३ जुलै रोजी रात्री स्वामीजींनी महासमाधी घेतली.

४ जुलैला दिवस उजाडता-उजाडता स्वामीजींच्या महानिर्वाणाचे वृत्त निवेदितेला कळविण्यात आले आणि त्या जबर आघाताने निवेदिता खचून गेली. स्वामी ! निवेदिताचे आश्रयस्थान, तिचे सर्वस्व ! ज्या गुरूने तिच्या जीवनाला अर्थ दिला व मार्ग दाखवला, ज्यांनी तिच्या जगातील अस्तित्वाला हेतू प्रदान केला, ते आता काळाच्या पडद्याआड गेले होते. प्रकाश लोपला अन् सर्वत्र अंधार भरून राहिला !!

निवेदिता तशीच धावत स्वामींच्या मठाकडे गेली. तिच्या दु:खी अंत:करणातून आक्रंदनाचे उमाळे बाहेर पडू लागले. तिने स्वामींना श्रद्धांजली

अर्पण केली त्यावेळी स्वामींच्या चेहऱ्यावर समाधीची चिरशांती विलसत होती.

आपल्या गुरूंच्या पार्थीव देहाशेजारी बसून निवेदिता, सकाळपासून तो दुपारी २ वाजेपर्यंत स्वामींच्या चेहऱ्यावर पंखा फिरवीत होती.

वेदमंत्रांचा घोष सुरू झाला. स्वामींचा पार्थीव देह मिरवणुकीने गंगातीरी नेण्यात आला. तेथेच अंत्यसंस्कार झाला. "जय स्वामीजी !" "स्वामी विवेकानंदजी की जय !" अशा गगन-भेदी घोषणा दुमदुमल्या.

अंत्यक्रियेसाठी जमलेला लाखोंचा समुदाय, काही मिनिटात दाहीदिशा पांगला. घाटावर उजाडतेचे सावट पडले. निवेदिता बिचारी एकटीच तिथे बसून होती. अवतीभवतीचा विचार न करता, कुठंतरी दूरवर क्षितिजापलिकडे नजर रोखून !

आता स्वामीजी उरले नव्हते. यापुढे निवेदिता तरी कुणाचा आसरा घेणार व कुणाकडे उपदेशाची याचना करणार ? तिच्या जीवाचे सांत्वन कोण करणार ?

**भारताच्या स्वातंत्र्यासाठी आंदोलन**

निराशेने खचून अश्रू ढाळीत बसणे अगर मनातल्या मनात कुढत राहणे हे निवेदितेच्या स्वभावातच नव्हते. तिच्या स्वामींनीही निवेदितेला दिलेली प्रेरणा नैराश्याची अगर भयाची नव्हती, तर आत्मविश्वास आणि धैर्याची होती. सिंहिणीने सावजाचा शोध घेण्यासाठी सज्ज व्हावे, आयाळ झटकावी आणि गगनभेदी गर्जना करून शाही पावले टाकीत मार्ग आक्रमावा, तशी निवेदिता उभी ठाकली. तिने व्यथा-वेदनांचा आवंढा गिळला आणि नेतृत्वाची धुरा सांभाळीत भारताला व जगाला आपल्या दिव्य संदेशाने साद दिली. भारताची प्रतिष्ठा हे तिचे ध्येय बनले आणि भारताला स्वातंत्र्य मिळवून देणे हे कार्य ठरले.

भारत आणि ब्रिटन मित्र म्हणून जगू शकतात, अशी तिची सुरुवातीची धारणा होती. पण ती धारणा मृगजळवत असल्याचा तिला प्रत्यय आला. ब्रिटन भारताचे सगळे ऐश्वर्यच लुटून–पिळून नेत असल्याचे निवेदितेला स्पष्ट दिसून आले. एवढेच नव्हे, तर साम्राज्यशाहीच्या

गुर्मीत, ब्रिटन भारताच्या आदरणीय सुपुत्रांचाही अवमान करीत असल्याचा अनुभव तिला आला.

दोन घटनांनी तर तिला जबर हादराच बसला. जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक जगदीशचंद्र बोस हे निवेदितेचे निकट स्नेही होते. फ्रान्समध्ये जगदीशचंद्रांचा, अनेक बहुमान देऊन जो गौरव करण्यात आला, त्याचा निवेदितेलाही सानंद सार्थ गर्व वाटला. पण ब्रिटनमध्ये मात्र जगदीशचंद्रांना त्यांच्या बहुमानाचा न्याय्य वाटा देण्यात आला नाही. दुसरी घटना बिपिनचंद्र पाल यांच्या-संबंधीची. भारताचा हा राष्ट्रवादी नेता, अमेरिकनांच्या मेळाव्यासमोर भाषणास उभा राहिला, तेव्हा श्रोत्यांमधून एक जण उसळून उभा राहिला व म्हणाला, "मिस्टर पाल, आधी तुमचा देश स्वतंत्र होऊ द्या, अन् मगच आम्हाला उपदेश करायला इथं या."

ह्या प्रसंगांची नुसती आठवण झाली तरी, निवेदितेचे रक्त तापून उसळत असे. जोपर्यंत भारत राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करीत नाही, तोपर्यंत भारतीयांना 'माणूस' म्हणून वागणूक

मिळणे अशक्यच, अशी निवेदितेची धारणा बनून गेली. आणि म्हणूनच गौरवर्णीयांच्या जगातही सगळ्यात गोरी म्हणून उठून दिसणाऱ्या या तेजस्वी महिलेने चिंतन, प्रचार आणि प्रत्यक्ष कार्य या तीनही माध्यमांतून भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढण्याचा विडा उचलला. भारत हीच आता तिची मातृभूमी होती. आपल्या वाणीचे व लेखणीचे सामर्थ्य स्वातंत्र्यलढ्यासाठीच वापरायचे असे निवेदितेने ठरविले.

**नागपुरात निवेदिता**

बंगालच्या प्रत्येक घरात निवेदितेच्या नावाचा उच्चार ऐकू येत असे. पाटणा, लखनौ, वाराणसी, मुंबई, नागपूर आणि मद्रास या सगळ्या प्रमुख शहरात, प्रचंड जनसमुदायासमोर भाषणे करून निवेदितेने स्वातंत्र्यलढ्याचे शिंग फुंकून लोकांना आवाहन केले. ब्रिटिश राजवट संतापाने लालबुन्द झाली, पण निवेदितेच्या वाणी –लेखणीचा ओघ बंद पाडण्याची कारवाई करण्यास ब्रिटिश राजवट धजली नाही. याउलट, ब्रिटनच्या अनेक मान्यवर नागरिकांनी कालांतराने

ब्रिटनचे पंतप्रधान झालेले रॅम्से मॅक्डोनाल्ड अणि नंतर भारताचे व्हाइसरॉय झालेले लॉर्ड मिन्टो यांच्या पत्नी लेडी मिन्टो यांनी निवेदितेच्या चिमुकल्या शाळेला भेट देऊन, भारतीय महिलांना साक्षर–सुशिक्षित करण्याच्या तिच्या महान कार्याची प्रशंसाच केली.

निवेदितेची शाळा राष्ट्रवादी विचारांचे केन्द्रच बनून गेली. बंकिमबाबूंचे राष्ट्रगीत "वन्दे-मातरम्" हे तिच्या शाळेतील प्रार्थना-गीत बनले. निवेदितेने खादी वापरायला सुरुवात केली. चरख्यावर सूत कातणे हा तिच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक बनला. निवेदितेच्या विद्यार्थिनीही दररोज सूत कातू लागल्या.

बंगालच्या कलाक्षेत्रात क्रान्ती घडविण्याचे श्रेयही निवेदितेलाच द्यावे लागेल. भारतीय संस्कृतीशी इमान न राखता आणि आपल्या अंत:करणातील स्फूर्तीचा वापर न करता, भारतीय रंग–चित्र 'कलाकार' पाश्चिमात्यांच्या कलेचे नमुने चितारणारे 'नक्कलकार' बनत असल्याचे निवेदितेच्या लक्षात आले. या दुष्प्रवृत्तीसाठी

निवेदितेने भारतीय चित्रकारांची चांगलीच कान-उघाडणी केली आणि कलेचे भारतीयत्व कायम राखण्यास त्यांना प्रवृत्त करून, गोडीगुलाबीने त्यांचे मन वळविले. अवनीन्द्रनाथ टागोर, नंदलाल बोस आणि असित हलदर यांच्यासारख्या अभिजात चित्रकारांना निवेदितेने मदत करून प्रोत्साहन दिले. त्यामुळेच ही मंडळी अजिंठा, वेरूळ आणि इतरही चित्र-शिल्प-सौंदर्यस्थळांना भेट देऊ शकली व आपल्या पूर्वजांपासून त्यांना स्फूर्ती मिळू शकली. निवेदितेच्या सामर्थ्यशाली प्रभावानेच बंगाली कला बहरली.

जे जे म्हणून 'भारतीय' ते ते 'प्रिय' हा निवेदितेच्या व्यक्तिमत्त्वाचाच भाग बनून गेला. भारतीयांना त्यांचा राष्ट्रीय वारसा समजावा म्हणून निवेदितेने जुन्या ग्रंथांचा गर्भितार्थ उलगडणारी पुस्तके लिहिली. भारतातील मूर्तिपूजा, धार्मिक आणि राष्ट्रीय सण, पवित्र तिथी आदी पुरातन संकेत जीवनसुखाच्या संदर्भात आवश्यकच होत, ही गोष्ट निवेदितेने पूर्वपक्ष–उत्तरपक्ष करून भारतीयांना पटवून सांगितली.

वेद, उपनिषदे, महाभारत आणि पुराणे आदींचे महात्म्य निवेदितेने उकलून दाखविले, एव्हढेच नव्हे तर भारतीय धर्मग्रथांची एकमेवाद्वितीय महती तिने स्पष्ट केली. भारतीय जीवनाशी एकरूप झालेल्या अनेक गोष्टींबद्दल सार्थ अभिमान बाळगला पाहिजे, हे निवेदितेने लोकमनावर बिंबविले, ही तिची फारच मोठी कामगिरी होय. कारण त्याकाळी अनेक लोकांना भारतीय वस्तू आणि रीतिरिवाज यांची उगाचच लाज वाटू लागली होती.

निवेदितेचे आयुष्य आता राजकीय चर्चा आणि चळवळी यांचा अखंड प्रवाह बनून गेले. जाहीर सभा, व्याख्याने, लेखन आणि प्रचंड पत्रव्यवहार यातच निवेदितेचा सगळा वेळ खर्ची पडत होता आणि तिच्या जीवनरसाचे झपाट्याने शोषण होत होते. तिचा मित्रपरिवार, अनुयायी आणि प्रशंसक यांचीही संख्या खूप वाढली. पूजनीय माताजींची लाडकी कन्या म्हणून निवेदिता नावाजली. रामकृष्ण परमहंसांच्या शिष्यवरांना तिच्या बद्दल आपुलकी व आदर वाटत असे.

रवीन्द्रनाथ टागोरांना तर निवेदिता म्हणजे स्फूर्ती देणारा अखंड झराच वाटायची. सुरेन्द्रनाथ बॅनर्जी, गोपाळकृष्ण गोखले, रमेशचंद्र दत्त, बिपिनचंद्र पाल आणि अरविन्द घोष यांना निवेदिता ही तत्त्वज्ञ व सखी वाटायची. देशातील तत्कालीन युवकांची ती आदर्शमूर्तीच बनून गेली.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि महात्मा गांधी ह्या थोर नेत्यांनीही निवेदितेच्या कार्याबद्दल आदर व्यक्त केला.

अशा रीतीने निवेदितेचे जीवन म्हणजे सेवा, त्याग, प्रयत्न आणि स्फूर्ती यांची गाथाच होय.

सतत परिश्रमामुळे निवेदितेचे शरीर ऐन तारुण्यातच थकून गेले. पण तिला विश्रांती कशी ती ठाऊकच नव्हती. लोकांनीही निवेदितेच्या कार्यकौशल्याचा भरपूर उपयोग करून घेतला, पण तिला काय हवे, याची वास्तपुस्त करण्याची त्यांनी फिकीर केली नाही.

१९०५ मध्ये निवेदिता खूपच आजारी झाली. तिच्या निकटवर्ती मित्रांनी, विशेषतः रामकृष्ण

आश्रमातील धर्मप्रचारकांनी, तिची सेवाशुश्रूषा केली. तिची प्रकृती थोडीशी सुधारली. पण ती विश्रांती घ्यायलाच तयार नव्हती. आपल्या दुबळ्या शरीराची तिने कधीच काळजी घेतली नाही. याचवेळी ब्रिटिश राजवटीने बंगालची फाळणी केली आणि आंदोलनाचा प्रचंड डोंब उफाळला. निवेदितेनेही त्या धुमश्चक्रीत उडी घेतली. दुसऱ्याच वर्षी पूर्व बंगालात महापुराने कहर माजवला. परिणामी भयाण दुष्काळाचे संकट ओढवले. पूरपाण्यातून मार्ग काढीत आणि चिखल तुडवीत, निवेदितेने पूरपीडित व दुष्काळपीडित यांच्या मदतीसाठी खेड्यांमागून खेडी धुंडाळली. पीडित जनतेच्या साहाय्यार्थ तिने बंगाली युवकांची संघटना उभारली.

आता मात्र तिची प्रकृती खूपच खचली. पण स्वतःच्या शरीराची अन् जीवाची पर्वा न करता ती गरिबांच्या व पीडितांच्या मदतीसाठी झुंजतच राहिली.

जेव्हा प्रकृती फारच ढासळली तेव्हा निवेदितेने मृत्युपत्र तयार केले व आपले सर्वस्व

बेलुर मठाला अर्पण केले. खरे तर तिच्याजवळ दैनंदिन खर्चासाठी जे थोडेसे पैसे होते ते वगळता संपत्ती अशी काही नव्हतीच तिने लिहिलेल्या पुस्तकांच्या 'कॉपीराइट' चे पैसे तिला नियमितपणे मिळायचे. हा हक्कही निवेदितेने बेलुर मठाला देऊन टाकला. जे जे काही माझे म्हणून गणण्यात येईल, ती सगळी संपत्ती भारतातील महिलांच्या शिक्षणासाठी वापरावी, असे निवेदितेने आपल्या मृत्युपत्रात नोंदविले आहे.

१३ ऑक्टोबर. सकाळची वेळ. निवेदिता दार्जिलिंगला होती. गेले कित्येक दिवस ढगाआड लपून बसलेल्या सूर्याने त्या दिवशी सकाळी एकाएकी दर्शन दिले आणि निवेदितेच्या खोलीत सूर्यकिरणांचा प्रकाश उमटला. निवेदिता गाढ समाधीत होती, डोळे उघडताच तिला सूर्यप्रकाश दिसला आणि ती कुजबुजली, "माझ्या देहाची ही दुबळी नाव आता बुडू लागली आहे, पण मला उगवत्या सूर्याचे दर्शन घडत आहे." हेच निवेदितेचे अखेरचे शब्द.

बुडाली ती नाव चिमुकली नव्हती. ते

प्रचंड सामर्थ्यशाली जहाज होते. निवेदितेला जो सूर्योदय दिसला, तसा प्रकाश तिच्यासारख्या काही निवडक लोकांच्याच अनुभवाला येतो.

सर जगदीशचंद्र बोस यांनी आपली सुप्रसिद्ध संशोधनसंस्था स्थापन केली. आणि त्या संस्थेत हाती दीप घेतलेली व पुढे पाऊल टाकण्यास सिद्ध झालेली स्त्री, अशी प्रतिमा स्थापन करण्यात आली. निवेदितेच्या स्मृत्यर्थंच जगदीशचंद्रांनी हे केले.

हिमालयाच्या कुशीत या महान महिलेचा पार्थीव देह विसावला. तिच्या समाधीच्या रूपाने अगदी साधा चौथरा उभारण्यात आला असून त्यावरील स्मृतिओळ अशी–' जिने आपले सर्वस्व भारताला दिले, ती निवेदिता येथे विसावली आहे.'

पण निवेदितेने स्थापन केलेली छोटीशी शाळा हे निवेदितेचे खरे स्मारक होय. त्या शाळेचा व त्यामागील हेतूचा आता भारतभर विस्तार झाला असून हजारो मुली व महिलांना त्या संस्थेद्वारे राष्ट्रीय शिक्षण मिळत आहे.

*

ग्र. ग्रं. ...
9392
BVBK-0401312
BVBK-0401312